# भाव सुगंध

– संपादक –

सेक्रेटरी, ताराराणी विद्यापीठ
कोल्हापूर
– १९७४ –

किंमत ५ रुपये

ताराराणी विद्यापीठ प्रकाशन : कोल्हापूर

# भा व सु गं ध

संपादक
सेक्रेटरी, ताराराणी विद्यापीठ
कोल्हापूर
–१९७४–

ताराराणी विद्यापीठ प्रकाशन : कोल्हापूर

किंमत ५ रुपये

मुद्रक : ग. शं. भोगावकर, अलंकार प्रिंटर्स, २२७ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर
© प्रकाशक : सेक्रेटरी, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

# दोन शब्द

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक–अध्यक्ष माननीय श्री. व्ही. टी. पाटील यांच्या सुविद्य पत्नी कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथराव पाटील या ताराराणी विद्यापीठाच्या उपाध्यक्षपदाची धुरा समर्थपणे वाहात असतानाच दिनांक १८ जुलै, १९६९ रोजी दिवंगत झाल्या. स्वतःला मूलबाळ नसताना दत्तक घेण्याच्या मोहात न पडता त्यांनी आपल्या सहा लाखाच्या स्थावर–जंगम इस्टेटीचा ताराराणी विद्यापीठाच्या विकासकार्यासाठी ट्रस्ट केला. स्त्रीशिक्षणसंस्थेसाठी एखाद्या स्त्रीने एवढा मोठा त्याग केल्याचे उदाहरण विरळाच. श्री. व्ही. टी. पाटील यानी या महामाऊलीचा प्रेरक परिचय आपल्या 'पार्श्वभूमी'त यथार्थतेने करून दिला आहे. अशा या त्यागी स्त्रीच्या जीवनातील संस्मरणीय स्मृती "भावसुगंध" रूपाने संकलित करून आम्ही देत आहोत.

या संकलनात कवी विश्वनाथ. सिनेदिग्दर्शक श्री. दिनकर पाटील, श्रीमौनी विद्यापीठाचे संचालक प्राचार्य डॉ. अंबादास माडगूळकर, प्राचार्य डॉ. मा. गो. माळी, ताराराणी विद्यापीठाचे सेक्रेटरी श्री. जयसिंग पाटील, दै. समाजचे संपादक मान. सर्जेराव पाटील यांच्या मौलिक स्मृती ग्रंथित केल्या आहेत. तसेच ताराराणी विद्यापीठाच्या सेवकवर्गापैकी कु. कांचन, सौ. ममता तावडे, श्री. राम शेवडे, श्री. शामकांत जाधव, श्री. विजयसिंह चव्हाण, श्री. बापूसाहेब रावण इ. नी आपला सुयोग्य वाटा उचलला आहे. विशेषतः श्री. दिनकर साळोखे (ड्रायव्हर) यानीही कृतज्ञ भावनेने आपल्या हृद्य आठवणी सांगितल्या आहेत हे कौतुकास्पद होय.

हे पुस्तक तयार करण्याच्या कामी मुद्रिते तपासणे, आखणी करणे इत्यादी बाबतीत ताराराणी विद्यापीठ रौप्य महोत्सव समितीचे मानद चिटणीस श्री. राम शेवडे यांनी बरेच परिश्रम घेतले आहेत.

छपाई सुबक व वेळेवर करून देण्याच्या कामी 'अलंकार प्रिंटर्स' चे मालक मान. गजाननराव भोगावकर व व्यवस्थापक श्री. प्रभाकर कुलकर्णी यांचे आभार मानणे अगत्याचे आहे. तसेच कव्हरची सजावट आकर्षक करून दिल्याबद्दल 'मयूर' चे श्री. मधुकर ओतारी यांचेही आम्ही आभारी आहोत.

हा "भावसुगंध" वाचकांना विशेषतः स्त्रीवाचकांना रंजक व प्रेरक ठरो ही अपेक्षा.

**जे. ए. पाटील**
सेक्रेटरी
ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

# : पार्श्वभूमी :

—श्री. व्ही.टी. पाटील

१९६९ च्या जून महिन्याच्या दुसरा आठवडा होता आणि त्या आठवड्यातील दि. १० अगर ११ चा दिवस. माझी पत्नी सौ. सरोज ही जीवघेण्या आजाराने अत्यवस्थ स्थितीत आमच्या बंगल्यातील बिछान्यावर असह्य अशा तापाने तळमळत पडली होती. संधीवात, मधुमेह आणि अनेक दिवस न हटणारा अंगात मुरलेला ताप या व्याधीने तिचे शरीर अत्यंत दुर्बल झाले होते. आमच्या कुटुंबाचे डॉक्टर श्री. जमेनीस यांच्या सकाळ–संध्या-काळच्या तळमळीच्या औषधोपचारानेही आजार कमी होण्याची कोणतीच चिन्हे दिसत नव्हती. संध्याकाळचा चारचा सुमार असावा. सरोजजवळ मी एकटाच होतो. अनेक दिवसापासून भोगाव्या लागणाऱ्या या निरनिराळ्या व्याधींच्या यातनांनी तिचे शरीर दुबळे आणि कृश झाले होते. पण तरी तिच्या चेहऱ्यावरचा करारी-पणा आणि समाधानी वृत्ती किंचितही कमी झालेली नव्हती. शरि-राच्या आणि मनाच्या या अवस्थेत असतानाच सरोजने दोन तीन मिनिटे माझ्याकडे एकटक पाहिले आणि तिच्या चेहऱ्यावरील भावावरून मला असे वाटले की तिला माझ्याशी काहीतरी विशेष असे बोलावयाचे आहे. मीही सरोजच्या नजरेला नजर देऊन काही वेळ दु:खित अंत:करणाने पण मूकपणे तिच्याकडे पाहात राहिलो होतो. पण इतक्यातच सरोजने आपले डोळे मिटून घेतले. मला वाटले की तिला झोप येत असावी. माझ्याशी बोलण्याची इच्छा तशीच दाबून ठेवून ती काही काळ डोळे मिटून झोपेच्या आधीन झाली.

सरोजच्या चेहऱ्याकडे मीही तसाच एकटक पाहात राहिलो व तिच्याशी विवाहबद्ध झाल्या दिवसापासूनच्या बेचाळीस वर्षांच्या जीवनाचा चलत्‌चित्रपट माझ्या डोळ्यासमोरून सरकू लागला.

१९२६–२७ ला मी बी.ए. च्या वर्गात असतानाच सरोजचे आणि माझे लग्न ठरविण्यात आले होते. एका अर्थी आमचा हा प्रेमविवाहच होता लौकिक अर्थाने नव्हे. आम्ही दोघे एकमेकांना हवे होतो, पण आमच्या लग्नाच्या आड दुसऱ्याही काही प्रबळ शक्ती येत होत्या. सरोजचे थोरले चुलते कृष्णराव हे आमच्या या लग्नाच्या थोडेफार विरुद्ध होते. त्याप्रमाणेच सरोजच्या आजी नानीबाई आणि आईपण. या मंडळींना असे वाटत होते की सरोजचे लग्न कुणातरी जमीनदार आणि धनवान अशा मुलाशी लावून द्यावे. पण या गोष्टीस सरोजचे वडील कै. दत्ताजीराव पाटील यांचा सक्त विरोध होता. त्यानी आपल्या मनोमन ठाम निर्णय घेऊन टाकला होता की सरोजला सर्वदृष्टीने योग्य वर म्हणजे मीच आहे आणि कै. दत्ताजीरावांचा हा कृतनिश्चय बदलण्याची शक्ती इतर कुणातच नसल्याने यथावकाश म्हणजे १९२७ साली बेनाडी मुक्कामी फार मोठ्या थाटाने आमचा विवाह झाला. आम्हा दोघांनाही जे पाहिजे होते ते मिळाले.

आमच्या उभयतांच्या लग्नाला सरोजचे चुलते श्री. क्षात्रजगद्‌गुरू महाराज आणि त्यांच्या प्रथम पत्नी कै. सौ. माणिकदेवी यांचा मात्र पहिल्यापासूनच पाठिंबा असल्याने लग्नानंतरचे एक दोन महिने आम्हा उभयतांचा मुक्काम त्यांच्याकडेच होता. आमचे हे दिवस मुलायम सुखाचे असे गेले. सरोजसारखी सर्वगुणसंपन्न पत्नी मिळाल्याने माझ्या जीवनात अवतीभवती सौभाग्य आणि मांगल्य थयथय नाचू लागले होते.

पुढील एल्‌एल्‌. बी. ची परीक्षा पास होऊन मी एकदाचा वकील झालो. श्री. क्षात्रजगद्‌गुरू महाराज हे छत्रपतींचे गुरू असल्याने परीक्षा पास होताच क्षात्रजगद्‌गुरू महाराजानी मला

छत्रपती राजाराम महाराजांच्या दर्शनास नेले. या पहिल्याच भेटीत राजाराम महाराजांनी मी संस्थानमध्ये नोकरी करण्या-बद्दलची आपली इच्छा बोलून दाखविली.महाराजाना मी म्हणालो, "महाराज, मी आपलाच आहे. पण नोकरी करण्यापेक्षा वकिली करून कोल्हापुरच्या सार्वजनिक जीवनात मला काम करावयाचे आहे." महाराजाना ही कल्पना पसंत पडली आणि त्यांचे आशीर्वाद घेऊन १९३० साली मी माझ्या वकिलीला सुरुवात केली.

शनिवार पेठेतील तेंडुलकरांच्या माडीवर आलो माझे वकिलीचे ऑफिस थाटले. बाररूमच्या सर्व वकिलांना चहापा-नाला बोलाविले आणि वकिलीस सुरूवात केली. एक महिन्याच्या आतच माझ्या वकिलीचा जम चांगल्याप्रकारे बसू लागला. पैसे मिळू लागले. एक उदयोन्मुख वकील म्हणून चहूकडे माझा बोल-बाला होऊ लागला. वकिलीच्या सुरुवातीच्या पहिल्या दिवसा-पासूनच त्या जुन्या काळात सुटाबुटात आणि डोक्यावर हॅट घालून जाणारा मीच पहिला वकील ठरलो. बाकीचे बहुतेक सर्व वकील कुणी पगडी, रूमाल, फेटे अगर टोप्या घालणारे होते. या वेळी मी शनिवार पेठेतील रतिगिरीच्या विहिरीजवळ करज-गारांच्या घरी रहात होतो. पण वकिलीचा जम चांगला बसला आहे असे पहाताच मी तेथून शुक्रवार पेठेतील वायंगणकरांच्या मोठ्या घरामध्ये रहायला गेलो. वृद्ध वायंगणकरांचा मुलगा काही महिन्यापूर्वीच कोल्हापूर संस्थानचा एक्झि. इंजिनीयर म्हणून होता. तो नुकताच वारला असल्याने त्याची एक फोर्ड टी मॉडेलची मोटारगाडी घराशेजारच्या गॅरेजमध्ये होती. म्हातारे, वायंगणकर एके दिवशी माझ्याकडे आले आणि म्हणाले, "घर तुम्ही घेतले. आमची मोटारही तुम्ही का घेत नाही ?" मी त्याना किंमत विचारली. गाडी जुनी होती. पण ती चालू स्थितीत होती. गाडीची किंमत त्यांनी रु. ४०० सांगितली. मी त्याना

मोटरच्या किंमतीचे पैसे ताबडतोब दिले आणि दुसऱ्या दिवशी त्या गाडीतून बाररूमकडे कोर्ट आवारात गेलो आणि यावेळी मी दुसरा एक विक्रम साधला. सुटाबुटात आणि हॅट घालून येणारा पहिला वकील व तसेच स्वतःच्या मोटारीतून येणाराही मीच पहिला वकील ठरलो.

माझ्या वकिलीचा जम दिवसेदिवस खूपच चांगला बसू लागला आणि सकाळसंध्याकाळ पक्षकार आणि त्यांची कामे यामध्येच माझा वेळ जाऊ लागला. याच सुमारास म्हणजे १९३० साली इलाखा पंचायतीच्या स्कूलबोर्डाचा चेअरमन होण्याचे भाग्य मला लाभले. जवळजवळ आठ वर्षे मी या स्कूल बोर्डाचा चेअरमन राहिलो.

१९३१ साली मी कोल्हापूर नगरपालिकेच्या निवडणुकी-साठी शुक्रवार पेठेतून म्हणजे डी वॉर्डातून उभा राहिलो आणि प्रचंड बहुमताने निवडून आलो. योगायोगाने १९३२ साली त्यावेळचे दुसरे एक उदयोन्मुख वकील श्री. एस. पी. सावंत हे लॉ कॉलेजमध्ये शिकवीत असताना अपघाताने सुरूंगाचा दगड त्यांच्या डोक्यात पडला आणि ते निधन पावले. श्री. सावंत हे त्यावेळी नगरपालिकेचे अध्यक्ष होते. श्री. सावंतांच्या मृत्यूने रिकाम्या झालेल्या नगराध्यक्षपदाच्या जागेसाठी नगरपालिकेत माझी एकमताने निवड झाली. मी नगराध्यक्ष झालो. कै. सावंतांची राहिलेली मुदत आणि त्यानंतर पुन्हा एकदा पूर्ण मुदतीसाठी एकमताने निवडून येऊन मी एकूण पाच वर्षेपर्यंत कोल्हापूर नगरपालिकेचा अध्यक्ष म्हणून राहिलो.

वकिलीच्या कामाचा वाढता पसारा, जिल्हा स्कूल बोर्डाचा चेअरमन आणि पुन्हा कोल्हापूर नगरपालिकेचा अध्यक्ष अशा अनेकविध कामाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना वेळ अपुरा पडू लागला. पण मी तरूण होतो. अंगात धडाडी होती. कर्तृत्व होते आणि सर्व करवीरवासीयांचे माझ्यावर अथांग प्रेम आणि

निष्ठा होत्या. म्हणून या सर्व श्रमाचे मला कधीच काही वाटले नाही

पण या सर्व कामामुळे अधूनमधून एक गोष्ट मला खट– कायची ती म्हणजे माझ्या या कामाच्या व्यापामुळे माझे सरोज– कडे अनेक वेळा दुर्लक्ष होऊ लागले. सार्वजनिक कामे आटोपून पुष्कळ वेळेला रात्री दहा दहा, अकरा अकरा वाजेपर्यंत मी परत येत असे. नंतर जेवण आणि जेवणानंतर दुसऱ्या दिवशीची कोर्टातील कामे वाचून तयार करून ठेवणे. बिचाऱ्या सरोजचा जीव अगदी माझ्या या प्रचंड धडपडीमुळे मेटाकुटीस येत असे. पण तिने कधीच नाराजी दाखविली नाही. नेहमीच्याच प्रसन्न चर्येने रात्रीबेरात्रीही ती माझे स्वागत करीत असे आणि आप– ल्याला होत असलेला त्रास मला तिने कधीच जाणवू दिला नाही.

छत्रपती राजाराम महाराजानी माझ्यावर खूप विश्वास टाकला होता. दर तीन चार दिवसांनी मीं त्यांच्या दर्शनासाठी वाड्यावर जात असे. पब्लिक प्रॉसिक्यूटरच्या जागेवरही त्यानी माझी नियुक्ती केली आणि हेही जादा काम माझ्यावर येऊन पडले. महाराजांचा कँप बऱ्याचवेळा रायबाग आणि दाजीपूर येथे असे. या कँपमध्ये महाराजांच्या समवेत राहण्यासाठी अधूनमधून मला जावे लागे. त्याचा एक परिणाम असा झाला की काही काही महत्वाच्या कामामध्ये महाराज माझा सल्ला घेऊ लागले आणि पुढे १९३१ साली इलाखा पंचायतीत सरकार नियुक्त सभासद म्हणून माझी महाराजांनी एकमताने निवड केली आणि त्याच वर्षी इलाखा पंचायतीचा एकमताने अध्यक्ष झालो. हे अध्यक्षपद जवळजवळ आठ वर्षे म्हणजे १९४८ पर्यंत माझ्याकडे राहिले. इलाखा पंचायतीच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीमध्ये कोल्हापूर जिल्हा मात्र मला सर्वार्थाने आणि सर्वांगाने पहावयाला

मिळाला. रस्ते, विहिरी, देवालये, चावडचा, धर्मशाळा अशा–सारख्या कामाच्या पाहणीसाठी इंजिनियरना बरोबर घेऊन मी खूपच फिरती केली. अशा फिरतीच्या वेळी बऱ्याच वेळा मी सरोजलाही माझ्या बरोबर घेऊन जात असे. यामुळे तिलाही ग्रामीण भागातील परिस्थिती आणि लोक जवळून पाहाता आले. घरी काढाव्या लागणाऱ्या कंटाळवाण्या जीवनात तेवढाच तिला एक विरंगुळा वाटत राहिला.

माझ्या वकिलीचे दरमहाचे उत्पन्न आता शिगेला पोहोचले होते. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वात मोठा वकील म्हणून लोक माझ्याकडे पहात होते. सेशन्सची कामे, हायकोर्टामधील कामे आणि खुद्द महाराजांच्या समोरदेखील काही निवडक कामे चालविण्याची संधी मला मिळाली. त्या जुन्या काळात माझे दरमहाचे उत्पन्न तीन ते चार हजार रुपयापर्यंत गेले होते.

माझ्या वैभवाची आणि भाग्याची वाटेकरीण म्हणून सरोज खूपच आनंदात होती. त्यावेळच्या संस्थानी जीवनात जेथे जेथे या ना त्या कारणाने माझ्या नावाचा जयजयकार केला जात असे तेथे माझी धर्मपत्नी म्हणून माझा हा मोठेपणा सरोजच्याही वाटणीला खूप प्रमाणामध्ये येत होता. दागिने, कपडे या बाबतीत सरोजला मी कधीच काही कमी पडू दिले नाही. पण दुसऱ्या एका बाबतीतील सुख मात्र मी सरोजला त्यावेळी अगर नंतर पुढे कधीही देऊ शकलो नाही आणि ते सुख म्हणजे संततीसुख होय.

आमच्या लग्नानंतर पहिल्या पाचसहा वर्षापर्यंत मला संतती झाली नाही म्हणून फारसे काहीच वाटले नाही. पण पुढे पुढे सरोजला मात्र या गोष्टीचे फारच दुःख होते आहे हे मला आढळून येऊ लागले. नात्याच्या आणि ओळखीच्या बायकांमध्ये हाच एक विषय चर्चिला जाऊ लागला. सरोज दुःखी होऊ लागली. मला तिचे समाधान कसे करावे हेच समजेनासे झाले. मी जात्याच वैभवाच्या पाठीमागे होतो, कीर्तीच्यामागे लागलो

होतो. पण वैभव आणि कीर्ती ही स्त्रीला सर्वार्थाने सुखी करू शकत नाही. स्त्रीला संतती हवी असते, पुरुषापेक्षाही जास्त तीव्रतेने, जीवनाच्या हव्यासाने. संततीविना स्त्रीला आपले जीवन अपुरे वाटते, व्यर्थ वाटते आणि सरोजच्या बाबतीतही नेमके हेच घडले.

संततीसाठी सरोजने व्रतेवैकल्ये करायला सुरुवात केली. देवाची पूजाअर्चा तासन्तास ती करू लागली. अनेक देवदेवतांच्या पूजेसाठी ती जाऊ लागली. पण या साऱ्या प्रकाराकडे मी फारसे कधीच लक्ष दिले नाही. कीर्तीच्या आणि समृध्दीच्या एकतऱ्हेच्या मस्तीतच मी गुंग होतो. संतती नाही म्हणून सरोजच्या मनाला होत असलेल्या यातना खऱ्या अर्थाने मी कधीच आकलन करू शकलो नाही.

लग्नानंतरच्या पंधरावीस वर्षानंतर मात्र सरोजला कळून चुकले की आपल्याला या जन्मी संतती योग नाही. डॉक्टर तपासणी तिची आणि माझी करून घेण्यात आली. दोष असा कोणताच दोघांमध्ये आढळून आला नाही. पण तरीही संततीयोग लाभला नाही एवढे मात्र खरे. पुढे पुढे मात्र सरोजने आपल्या मनाला आवर घातला आणि परमेश्वरभक्ती आणि माझ्यावरील प्रीती यातच तिला आपल्या जीवनाचे सार्थक वाटायला लागले. तिची दृष्टी विशाल झाली. हजारो लहान मुलांमुलींना ती त्यांच्या जीवनात हस्तेपरहस्ते साहाय्य देऊ लागली. तिच्या जीवनाचे सामाजीकरण आपोआपच झाले.

१९४८ साली महात्मा गांधींचा वध झाला आणि तो एका ब्राह्मणाने केला म्हणून कोल्हापूर जिल्ह्यात आणि बाहेरही हजारो ब्राह्मणांची घरेदारे जाळण्यात आली, त्यांची चीजवस्तू लुटण्यात आली, त्यांना मारहाणही केली गेली. सर्व कोल्हापूर जिल्हा बाहेरच्या जगात बदनाम झाला आणि पुढे एकदोन

वर्षीच म्हणजे १९५० साली त्यावेळचे मुंबई हायकोर्टाचे सर–न्यायाधीश श्री. छगला यांची कोल्हापूरला भेट ठरली. न्यायमूर्ती छगला यांचे कोल्हापूरात त्यांच्या मोठेपणाला साजेसे स्वागत केले जावे म्हणून मी प्रयत्न करावयाचे ठरविले. बार असोसिएशनच्या अध्यक्षाची निवड व्हायची होती. त्या निवडणुकीस मी उभा राहिलो आणि एकमताने निवडून आलो. न्यायमूर्ती छगलांना टाऊनहॉलमध्ये बार असोसिएशनतर्फे आम्ही अॅड्रेस दिला आणि संध्याकाळी विद्युत्‌दीपानी प्रकाशित झालेल्या टाऊनहॉलमधील बँडस् स्टॅन्डच्या परिसरात त्याना अॅटहोम पार्टी दिली गेली. बार असोसिएशनच्या अध्यक्षाची पत्नी म्हणून सरोजही अर्थातच माझ्याबरोबर होती. सर न्यायाधीश छगलाना हे सर्व काही नवीनच वाटले. कोल्हापुरात अशा तऱ्हेने आपले स्वागत केले जाईल अशी त्यांची कल्पनाच नव्हती, असे नंतर मला समजले. छगलाना घेऊन मी पन्हाळा आणि जयसिंगपूरला गेलो त्या ठिकाणचे कार्यक्रमही उत्तम तऱ्हेने पार पडले.

या कार्यक्रमानंतर सुट्टीमध्ये रावब. सावंत मुंबईहून कोल्हापूरला आल्यावेळी मला भेटावयास आले. मला त्यानी कडकडून मिठी मारली आणि माझे हार्दिक अभिनंदन केले. मी बुचकळचात पडलो. "दादा, हे काय ? कशासाठी ?" सावंतदादा मला म्हणाले "Mr. V. T. you have rendered signal services to Kolhapur and Kolhapurians. गांधीवधानंतर कोल्हापुरच्या जनतेचे नाव बाहेरच्या जगात इतके बदनाम झाले होते की कोल्हापुरचा म्हणून सांगायलाही मला मुंबईत लाज वाटत होती. पण तुम्ही छगलासाहेबांचे कोल्हापूर बार असोसिएशनतर्फे जे यथोचित स्वागत केले, त्यामुळे छगलांचे मत कोल्हापुरच्या लोकाबद्दल इतके चांगले झाले की, मुंबई हायकोर्टामध्ये त्यानी जाहीर उद्‌गार काढले की कोल्हापुरची माणसे अत्यंत सुसंस्कारित आहेत छगलांचे हे मत व्हायला तुम्ही कारणीभूत झालात, म्हणून तुमचे हे अभिनंदन."

छगला कोल्हापूरला यऊन गेले आणि मी माझ्या वकिली पेशास रामराम कायमचा ठोकला. १९५२मध्ये काँग्रेस तिकिटावर भुदरगड तालुक्यातून विधानसभेवर मी निवडून गेलो आणि योगायोगाने या निवडणुकीच्या संबंधात कै. भाऊसाहेब हिरे यांच्यासारखा महाराष्ट्राचा एक थोर सुपुत्र बंधू म्हणून मला लाभला. त्यांचा आणि माझा हा बंधुभाव भाऊसाहेबांच्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत अतूट राहिला. १९६२ ला मी पुन्हा काँग्रेस तिकिटावर संसदसदस्य म्हणून निवडून गेलो आणि १९६७ अखेर कोल्हापूर आणि दिल्ली येथे मला काम करावे लागले. या पाच वर्षांच्या काळात सरोजला घेऊन मी सर्व भारतभर खूप खूप फिरलो. काश्मीर, मसुरी, सिमला, कन्याकुमारी, जयपूर, उदेपूर वगैरे ठिकाणे आणि सर्व तीर्थक्षेत्रेही मी तिला दाखविली. माझ्या संगतीत भारताचा हा सर्व प्रवास करताना तिला खूप आनंद वाटला. समाधानाने तिचे मन भरून आले.

आमच्या जीवनाचा हा गतेतिहास एखाद्या चलत्चित्रपटाप्रमाणे नजरेसमोरून सरकत असतानाच सरोजने परत डोळे उघडले. तिचा थकवा थोडासा कमी झाला असे दिसले आणि माझ्याकडे पाहून ती म्हणाली, "साहेब, मला बसायचे आहे, मला उठवून माझ्या पाठीमागे तक्या द्या." मी त्याप्रमाणे केले. सरोजने मला आपल्या अगदी जवळ बोलाविले. माझे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि ती म्हणाली, "साहेब, माझ्या जाण्याची वेळ आता नजीक आली आहे. पण त्यापूर्वी काही गोष्टी मला आपल्याला सांगावयाच्या आहेत." सरोजने आपल्या उशाखालच्या किल्ल्या काढून माझ्या हाती दिल्या.सरोजच्या अंगावरचे सोन्याचे हिऱ्यामोत्यांचे दागिने ज्या कपाटात आणि डब्यात होते. त्याची माहिती मला तिने दिली आणि तो सर्व माल कपाटातून आणून मला त्याप्रमाणे आहे की नाही, हे पहावयास सांगितले. तिच्या सांगण्याप्रमाणे सर्व माल ज्या त्या ठिकाणी व्यवस्थित होता. तसे

तो मी त्या त्या ठिकाणी ठेवला. हातातील सोन्याचे बिलवर आणि कानातील हि-याच्या कुडचा तिने स्वतःहून काढल्या आणि त्या माझ्या हाती देऊन कपाटात व्यवस्थित ठेवण्यास सांगितले. सरोजचे हे करणे आणि वागणे म्हणजे अखेरची निरवा-निरव आहे हे मी जाणले. तिच्या चिरवियोगाच्या कल्पनेने माझे अंतःकरण सद्गदित होऊन भरून आले आणि डोळयांतून अश्रुधारा वाहू लागल्या. पण सरोज अगदी शांत होती. तिच्या डोळयांत मला अश्रू दिसले नाहीत एकाद्या तपस्विनी योगिनी–प्रमाणे ती शांतपणे, शांतचित्ताने आणि शांतवृत्तीने मला जग सोडण्यापूर्वीचा जणू काय शेवटचाच निरोप देत होती.

ज्या त्या वस्तू कपाटात ठेऊन झाल्या आणि मी पुन्हा एकदा सरोजजवळ येऊन बसलो. यावेळी सरोजने माझे हात आपल्या कृश हातात धरले. ती भारावून गेली आणि भावनारुद्ध कंठाने माझ्याकडे पाहून म्हणाली, ‘ साहेब, मी आपल्याला संतती देऊ शकले नाही, याबद्दल मला क्षमा करावी.’ सरोजच्या या उद्गा–राने मी हतबुद्ध झालो. तिच्या नजरेला नजर मी भिडवली, तिच्या पाठीवर हात ठेवला आणि प्रेमळपणाने पाठीवरून हात फिरवीत मी उत्तरलो, ‘ सरोज, तू मला संतती देऊ शकली नाहीस, हा तुझाच अपराध आहे असे तू मानतेस. हा तुझ्या मनाचा मोठेपणा आहे. संतती न होण्यास केव्हा केव्हा पत्नी इतकाच पतीही जबाबदार असतो. नव्हे पुष्कळ वेळा पुरूषच जास्त जबाबदार असतो.आपल्याला संतती झाली नाही याला कदाचित मीही जबाबदार असेन. पण संतती झाली नाही म्हणून तो दोष तुझा अगर माझा म्हणून विषाद वाटून घेण्याचे अगर एकमेकाला जबाबदार धरण्याचे आता काहीच कारण नाही. नियतीने आपल्या नशिबी जे लिहिले होते ते घडून आले आणि म्हणूनच या घटनेने या अखेरच्यावेळी कोणत्याही तऱ्हेने दुःख तू मानू नकोस. संतती

नाही म्हणून माझे जीवन मी कधीच अपूर्ण असे मानले नाही, हे तुला ठाऊकच आहे. आपल्या पोटी संतती असावी ही सामान्यतः प्रत्येक स्त्रीची इच्छा असते, अत्यंत प्रबळ अशी इच्छा असते. संततीविना जीवनाची स्त्री कल्पनाही करू शकत नाही. स्त्रीच्या जीवनाच्या मर्यादा सामान्यतः घर आणि मुलाबाळापुरत्याच असल्याने संततीसंभव न होण्याने ती अत्यंत दु:खी होते. तिचे जीवन तिला असह्य वाटते. पण हे दु:खही तू अनेक वर्षापासूनच जिंकले आहेस. स्वतःच्या वैयक्तिक जीवनाच्या मर्यादेच्या पुढे जाऊन तू तुझ्या जीवनाचे सामाजीकरण केले आहेस. म्हणूनच तू स्वेच्छेने " सौ. सरोजिनीदेवी-विश्वनाथ विश्वस्त निधी " हा ट्रस्ट निर्माण करून आपली सर्व स्थावरजंगम इस्टेट अंगावरच्या दागदागिन्यासह, घरातील भांडीकुंडी, फर्निचरसह ताराराणी विद्यापीठ या स्त्री-शिक्षणसंस्थेला म्हणजेच माझ्या जीवनाच्या अंगीकृत कार्याला केव्हाच देऊन टाकली आहेस. आताचे तुझे दु:ख तुझ्या पोटी संतती नाही याबद्दलचे वैयक्तिक दुःख नसून ते दुःख माझ्यासाठीच आहे हे मी जाणतो. तुझ्या पोटी संतती न होण्याने माझ्या जीवनाला तू एका तऱ्हेने अपूर्णता आणण्यास कारणीभूत झाली आहेस असे तुला वाटत आहे. पण तसे तू मुळीच वाटून घेऊन नकोस.

सरोज, तुला ठाऊकच आहे की आपल्या वैवाहिक जीवनाच्या सुरूवातीपासूनच, आपल्याला मूल नाही, म्हणून मी स्वतः कधीच दुःखी झालो नाही. माझ्या अवतीभवती जी जी मुले मला दिसली त्या त्या सर्वांना मी माझे प्रेम दिले. त्यांच्या आनंदाने मी आनंदी झालो आणि त्यांच्या सुखाने मी सुखावलो, त्यांच्या दुःखाने मी दु:खी झालो. स्वतःच्या वैयक्तिक जीवनाच्या कक्षा विस्तारून जीवनाचे सामाजीकरण करणे हाच मी माझा धर्म मानीत आलो. परमेश्वरकृपेने आणि तुझ्या पुण्याईने मी त्यात यशस्वी झालो हे माझे सद्भाग्य असे मी मानतो.

तुझ्या पोटी संतती झाली नाही म्हणून मी दुसरे लग्न करावे म्हणून माझ्या अनेक नातेवाईकांनी व इष्टमित्रांनी आग्रह केला. असा आग्रह खुद्द तुझ्या जन्मदात्या पित्यानेही मला केला होता, हे तू जाणतेस. पण त्या सर्व आग्रहाला मी शेवटपर्यंत नकार दिला आणि याचे एकमेव कारण म्हणजे तू.

जीवनात मला जे काही हवे हवे असे वाटत होते आणि पाहिजे होते म्हणून मी धडपडत होतो, ते ते सर्व काही तुझ्यापासून मला मिळाले. प्रेम, माझ्या अंगीकृत कार्याविषयी अथांग अभिमान, माझ्या जीवनातील कठीण प्रसंगी अढळ धैर्य, माझ्या दु:खाच्या प्रसंगी असीम आधार हे सर्व काही तू मला दिलेस. माझ्या जीवनात तू एक देवता म्हणून आलीस, माझे जीवन तू सदैव प्रकाशमय केलेस. माझ्या दु:खांने तू दु:खी झालीस, माझ्या सुखाने तू सुखावलीस. तुझ्यासारखी देवतातुल्य पत्नी मला लाभली म्हणून माझे सारे जीवतच सोन्याचे झाले आहे, धन्य झाले आहे. संतती सुखापेक्षा माझ्या जीवनाला तू जी ही तृप्ती आणि पूर्ती दिली आहेस, तिचे मोजमाप कशानेही करता येणार नाही. पण सरोज, मला तू संतती देऊ शकली नाहीस म्हणून जराही वाईट वाटून घेऊ नकोस. तू मला दिलेले नाहीस असे काहीही नाही. कुणाही धर्मपत्नीकडून जे जे अपेक्षावे, चिंतावे ते ते सर्व काही मी तुझ्याकडून भरून पावलो आहे."

माझ्या या उद्गाराने सरोजला खूप समाधान लाभले असावे असे दिसले. तिचा चेहरा प्रसन्न वाटला आणि मी पुन्हा एकदा बोललो, "सरोज, तुझा हा आजचा निरोप हा निर्वाणीचा आहे, अखेरचा आहे, असे मला वाटते. जवळजवळ ४२ वर्षांचे वैवाहिक जीवन आपल्या दोघांच्या वाट्यास आले. १९३० सालापासून सार्वजनिक जीवनात मी उडी घेतली आणि आजअखेर तेच कार्य मी जीवनाच्या सर्व निष्ठा पणाला लावून करीत

राहिलो आहे. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात माझ्या या अभंग धडपडीमुळे माझ्याकडून अनेक वेळा तुझ्या भावनांची, वैयक्तिक आशाअपेक्षांची उपेक्षा झाली आहे हे मला ठाऊक आहे. तुझ्यासारख्या देवतेची उपेक्षा करूनही मी माझ्या सार्वजनिक जीवनात अपरिहार्यपणे गुंतून राहिलो, काही वेळा जवळजवळ तुला विसरलो, तरीही तू कधी नाराजी व्यक्त केली नाहीस. माझ्यावर राग धरला नाहीस, उलट माझ्या अंगीकृत कार्यात अधिक चैतन्य प्राप्त होण्यासाठी तू नेहमीच माझ्यावर प्रेमाचा अमृतवर्षाव केलास. जीवनात आतापर्यंत वकिलीच्या पेशात,सार्व–जनिक जीवनाच्या विविध क्षेत्रात आणि विशेषतः शिक्षणकार्यात मी जे यश मिळविले, ते सर्वच्यासर्व मला तुझ्याच चरणी वाहा–यला हवे. तुझ्या प्रेमाच्या, पुण्याईच्या, पाठिंब्याच्या आधाराशिवाय मला यातले काहीच करता आले नसते. माझे दोषही तू पोटात घालून घेतलेस. माझ्या दोषावरही तू मातेच्या ममतेचे पांघरून घातलेस आणि स्त्रीची जी तीन रूपेम्हणजे - कन्या म्हणून तू माझी अखंड सेवा केलीस, पत्नी म्हणून मला अमृतमधुर प्रेम दिलेस आणि माता म्हणून मला तू सांभाळलेस.आज या क्षणी परमेश्वर–चरणी एकच प्रार्थना करावीशी वाटते की माझ्या अगोदर तू जाऊ नयेस अगर तुझ्या अगोदर मी जाऊ नये. परमेश्वराने आपल्या कृपेची खैरात करून तुला आणि मला एकमेकांच्या हातात हात घालून या जगाचा अखेरचा निरोप घेता आला असता, तर ते आपल्या दोघांचेही सद्भाग्य ठरले असतें. " मी पुन्हा म्हणालो, "सरोज, तू परम देवभक्त आहेस. श्रीदत्तगुरूंची तू असीम सेवा केली आहेच. श्रीदत्तगुरू तुला दृष्टांतही देतात. शिवाय तुझी इच्छाशक्तीही अत्यंत प्रबळ आहे. तुझी ही ईशभक्ती इच्छाशक्ती यांच्या जोरावर तू आपले जीवन निश्चितपणे वाढवू शकशील असा मला विश्वास वाटतो आहे.माझ्यासाठी तू हे कर." माझ्या बोलण्याने सरोज पुन्हा एकदा सद्गदित झाली आणि

म्हणाली, " साहेब, मला या मोहात आता पाडू नका. सर्व आयुष्यभर मी तुमची निष्ठापूर्वक सेवा केली. आता मी थकले आहे, दुबळी झाली आहे आणि माझ्या शरिराच्या अशा विकल अवस्थेत माझी सेवा तुम्हाला करावी लागत आहे. जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यन्त तुमची सेवा करण्यात मी जीवन सार्थक मानले असताना तुमच्याकडूनच मला सेवा घ्यावी लागत आहे, यात मला माझ्या ध्येयाचा पराभव होतो आहे, असे वाटू लागले आहे. म्हणूनच मला आता जायचे आहे अहेवपणी. आता दुसरा कोणताच विचार अगर मोह माझ्यासमोर नाही. "

सरोज कृतज्ञतेने भरलेल्या अश्रूंनी माझ्याकडे पाहात होती आणि मी त्याच कृतज्ञतेच्या अश्रूचे डोळ्यातून पाट वाहवत तिच्याकडे पहात होतो. आम्हा दोघांचे हात एकमेकांच्या हातात होते. जीवनाच्या तृप्तीच्या, असीम शांतीच्या आणि सात्विक प्रेमाच्या समाधीत आम्ही दोघेही न्हाऊन निघालो.

**



कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथराव पाटील

जन्म : २८–४–१९०९ मृत्यू : १८–७–१९६९

# कै. सौ. कमला तथा सरोजिनीदेवीस

**– विश्वनाथ**

नव्हते तुजला मला सोडुनी
जायाचे या जगातुनी
जीव गुंतला होता सगळा
तुझा देवते! पतीजीवनी
भक्तिप्रीतिमय निर्मळ प्रेमळ
तपस्विनीचे जीवन सगळे
समर्पिले तू पती आणि पति–
कार्यी संतत गे अपुले
लाभलीस तू पत्नी म्हणुनी
शतजन्मींच्या पुण्याईने
कृतार्थ जीवन पावन आत्मा
जीवन भरले चिरतृप्तीने
हीन दीन अन् उपेक्षितांची
वाहिलीस तू सदैव चिंता
गर्व कधी ना तुला स्पर्शिला
मूर्तिमंत तू विनम्रता
नाही केला उभ्या जीवनी
कधी कुणाचा हेवादावा
चिंतिलेस ना अहित कुणाचे
सत्वशील तू प्रियंवदा

तू प्रीतीला सातत्य शिकविले
मांगल्याला पावन केले
तू त्यागाला देवत्व दिले
जीवन त्यांचे तूच नटविले
तू भक्तीची एकनिष्ठता
सेवेची निरपेक्ष देवता
तू त्यागाची मूर्ति मानवी
दयाक्षमेची तू तर माता
तुझ्या संगती सुखराशींची
लूट लुटाया झालो पुढती
अन् दुःखांच्या निर्दय रात्री
सह्य जाहल्या तुझ्याच प्रीती
अमृतगोडी तव सहवासी
आठवणी त्या आज मनासी
अनंतात तू जरी दूरवर
स्मृती तुझी मम उरी निरंतर
माझ्याविण तू तुझ्याविना मी
नाहि कल्पिले कधी मनी
पण दैवाने हाय? घडविले
घडू नये ते या जन्मी
स्वप्ने विरली आशा सरली
जीवन उरले जगायचे
कर्तव्यांच्या पूर्तीसाठी
एक दिनी मग मरायचे

*

# सुकन्या, सुकांता, सुमाता : माझ्या आक्का

**– दिनकर द. पाटील**

सकाळीच आमच्या " कोर्टाची पायरी " या चित्राचा मुहूर्त झाला. क्षात्रजगद्गुरूंच्या हस्ते तो अत्यंत थाटात पार पडला. माझे वडील आण्णा यांचं सारं जीवन दत्तकाच्या खटल्यात कामी आल. त्यांच्याच " जिद्दीचं " चित्रण मी त्यात करणार होतो. दुसऱ्या दिवसापासून नियमितपणे शूटिंग करावं म्हणून मी त्या रात्री अगदी आनंदात झोपी गेलो. शूटिंगकरिता आम्हाला फक्त चारच दिवस मिळाले होते. म्हणून त्या चार दिवसात एक सेट पूर्ण करण्याचा माझा विचार होता.

मला दुसरे दिवशी सकाळी जाग आली ती नटराज हॉटेलच्या मॅनेजरच्या हाका मारण्यानं. ते भल्या सकाळीच निरोप घेऊन आले, " दिनकरराव तुमचा फोन आहे. "

इतक्या सकाळी मला फोन कोण करणार ? मी फोनवर गेलो तो दुसऱ्या बाजूनं धाकटे बाळ–विजयसिंह बेनाडीकर–बोलत होते, " दादा फार दुःखद बातमी आहे. "

" कसली ? "

" आक्का गेल्या. " माझा विश्वासच बसेना. त्या अलिकडे आजारी असायच्या हे खरं तरी घटप्रभेला गेल्यावर त्यांना आराम वाटायचा. पण बातमी खोटी नव्हती. मी कुणाला काही कल्पना न देता स्टुडिओत गेलो. घटप्रभेहून आक्कांचा पार्थिव देह मोटारीनं

येणार होता. तोपर्यन्त काही निर्णय घेणं जरुर होतं. शूटिंगची सारी तयारी होती. पण आक्कांच्या निधनाची बातमी माझ्या आधीच स्टूडिओत पोचली होती. कुणाशी काही न बोलता मी कामाला लागलो. तोच धाकटे बाळ गाडी घेऊनच आले. मी ओळखलं. काही न बोलता सौ. सुमनसह मामांच्या बंगल्यावर गेलो. बागेत माणसं जमली होती. सर्वांच्या डोळ्यात अश्रू तरळत होते. त्याच्यामधून वाट काढीतच मी माडीवर गेलो. मामा—व्ही. टी. पाटील—पोरक्या पोराप्रमाणं कॉटवर पडले होते. मी धावतच त्यांच्या जवळ गेलो. मी काय बोलणार? तेही काय बोलले नाहीत. बोलण्याचं काम आमच्या आसवांनीच केलं. आक्कांचा देह बाजूच्या हॉलमध्ये तक्क्याला टेकवून बसवला होता. मी आक्कांचं दर्शन घेतलं. हुंदक्याच्या वातावरणातही त्या ध्यानस्थ बसल्याप्रमाणं दिसत होत्या. मी त्यांच्या पायांना स्पर्श केला आणि पाहिलं. आक्का काही बोलत नव्हत्या. न बोलताच अनेक भाव मला स्पर्शून गेले. माझ्या डोळ्यात आसवं जमली—आणि त्या आसवांच्या सागरात आमचा अवघा जीवनक्रम एखाद्या चित्रपटाप्रमाणं माझ्या डोळ्यासमोर तरळू लागला.

बेनाडीकर दत्ताजीराव पाटलांची पोर म्हणून आक्का जन्माला आल्या. खेड्यातच त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यावेळी मुलाचं शिक्षण व्हायची पंचाईत - मग मुलींचं शिक्षण कुठलं व्हायला ? पण मला वाटतं मुलींचं खरं शिक्षण त्यांच्या घरातच होत होतं. आक्काना नाहीतरी शाळेची आवड अशी फारशी नव्हतीच. शाळा चुकवण्यासाठी त्या आपलं दप्तर दडवून ठेवायच्या आणि घरकामाला लागायच्या.

घरकामात मात्र आक्कांचा हात कोणी धरत नसे. रोजचा स्वयंपाक तर त्या करायच्याच पण ‘ हातावरली भाकरी ’ खावी आक्कांचीच. त्याशिवाय पूजाअर्चाही त्याना प्रिय होती. हिंदूधर्मात देवांना आणि सणांना तोटा नाही. आण्णा-तात्या आम्हांला

हरेक देवाची कथा सांगायचे-आणि सणांचं महत्वही पटवून द्यायचे. आक्का ते सारं ऐकायच्या आणि मुलींचे जे सण असायचे ते अत्यंत भक्तीपूर्वक साजरे करायच्या. हादगा बोळवण्यापासून नागपंचमी, हरताळका, गौरीगणपतीची गाणी आक्का मुलींसह फेर धरून म्हणू लागल्या की, कसं ऐकत बसावसं वाटायचं.शाळेचं शिक्षण नसलं तरी आक्कांच्या बालमनावर या साऱ्यांचे संस्कार झाले होते आणि म्हणूनच आक्का म्हणजे आमच्या घरी सगळ्यांच्या खूप लाडक्या होत्या. अजूनही चित्रामधून ग्रामीण कन्यकेचं चित्र जेंव्हा मला रंगवायची पाळी येते, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर उभी राहाते ती आक्कांचीच निरागस बालमूर्ती.

आम्ही शिक्षणाकरिता कोल्हापूरला आलो आणि आक्कांचं लग्न मामांच्याशी झालं. आक्का इतक्या देखण्या दिसायच्या की आण्णा नेहमी म्हणायचे, "माझी पोर राजाची राणी होईल राणी." राजाच्या राणीबद्दल आण्णांची काय कल्पना असेल ती असो, माझी कल्पना आक्कामामांची वरात निघाली ती पाहून साकार झाली. आपल्या घरचं पहिलं लग्न म्हणून क्षात्रजगद्गुरूंनी आपला हत्ती बेनाडीला पाठवला होता. गावदरीतल्या लिंबाखाली तो झुलायला लागला मात्र सारा आसमंत हत्ती पहायला जमा झाला. आक्कामामांची वरात त्यावरून निघाली आणि माझ्यातरी डोळ्यांचं पारणं फिटलं. "कोर्टाच्या पायरीतच" छत्रपतींच्या हत्तीला उद्देशून मी एक वाक्य लिहिलं आहे, "अरं छत्रपतींचा हत्ती हाय त्यो. राजाला पाठीवर घेतो माकडाला नाही." हे लिहिताना माझ्या डोळ्यासमोर राजाराणी म्हणून होते ते आक्का आणि मामाच !

योगायोग म्हणा आक्कामामांचं लग्न झालं आणि मामांची भरभराट सुरू झाली. वकील म्हणून ते कोल्हापुरात गाजलेच. पण त्याहीपेक्षा सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही त्यांचा अधिक बोलबाला झाला. कोल्हापूरची म्युनिसिपालिटीची निवडणूक असो वा

इलाखा पंचायतीची असो, मामा एका दृष्टीनं नशीबवान म्हटले पाहिजेत. आजपर्यंत एकही निवडणूक मामा हरले नाहीत. ते म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष झाले, इलाखा पंचायतचे अध्यक्ष झाले, इतकेच नव्हे तर आमदार आणि खासदारपदंही त्यानी भूषविली. कै. भाऊसाहेब हिऱ्यांचा राजकीय पवित्रा जमला असता तर मंत्रीपदही त्याना लाभलं असतं. हे सांगण्याचा हेतू इतकाच की आक्काना एकही ऐहिक सुख देवानं कमी पडू दिलं नव्हतं.

आक्कामामांच्या घरीच मी लहानाचा मोठा झालो आणि निर्माता दिग्दर्शक झाल्यानंतरही तीनचार चित्रं मी त्यांच्या घरी राहूनच निर्माण केली. एवढ्या अवधीत एका गोष्टीचं मला आश्चर्य वाटायचं. नवराबायकोचा रुसवा फुगवा मला कधीच कसा दिसला नाही ? वा ऐकूही आला नाही ? मला जर कधी आदर्श संसाराचं चित्र काढायची पाळी आलीच तर मी आक्का–मामांचाच संसार चित्रित करीन, लोकासमोर ठेवीन.

पण परमेश्वर हरेक सुखाला गालबोट लावतो की काय कोण जाणे ? आक्कांच्या संसारात एकच उणीव राहिली आणि ती म्हणजे मुलाची. दोघांनाही लहान मुलांची आवड. पण परमेश्वरानं त्यांना स्वतःचं मूल देऊन काही ती पूर्ण केली नाही. हे दुःख मात्र आक्कांच्या मनात खोलवर सलत होतं आणि याला कारण म्हणजे स्त्रीचं पत्नीपद कितीही आदर्श असो, तिला मातृ–पद लाभलं नाही तर तिचं पत्नीपदही अनेकदा धोक्यात येतं. मी पाहिलं आहे, ऐकलं आहे, मुलासाठी का होईना मामानी दुसरं लग्न करावं म्हणून अनेकांनी सांगून पाहिलं, अनेकांनी दत्तक घेण्याचाही पर्याय सुचवून पाहिला. एवढंच नव्हे तर आक्कांची मुलांबद्दलची ओढ पाहून अनेकांनी आपली लहान मुलंही त्यांच्या मांडीवर घालून पाहिली. पण या बाबतीत आक्कांचा एकच निर्धार होता. मामांना जे मान्य असेल त्याच्या तसूभरही आपण बाहेर जाणार नाही.

या बाबतीत मामा कधीच काही बोलायचे नाहीत. मला वाटतं न बोलता करून दाखवणं हाच त्यांचा स्वभाव आहे. मामानी अनेक प्रलोभनं टाळून दुसऱ्या लग्नाचा विचारही मनात आणला नाही. आणि मला वाटतं हेच मामांचे आक्कांच्यावर फार मोठे उपकार आहेत. आक्का मामांच्याबरोबर छायेसारख्या राहिल्या, कारण मामानीही त्याना एकदा जी साथ दिली ती अखेरपर्यंत सोडली नाही. हे ऋण आक्कांना इतक मोठं वाटायचं की त्यानी मामांच्यावर गडकऱ्यांच्या सिंधुप्रमाणं प्रेम केलं. त्यांच्या नुसत्या गुणांवरच नव्हे तर त्याच्या अवगुणांवरसुद्धा ! मोठ्या माणसाची पत्नी होण्यात भूषण असलं तरी पत्नीपदाचा तो मुकूट किती काटेरी असतो हे मोठ्या माणसाच्या पत्नीलाच कळेल, इतरांना नाही.

सुदैवानं मामांच्या अवगुणांची संख्या सद्‌गुणांपेक्षा फार कमी आहे. विशेषत: त्यानी गारगोटीचं मौनी विद्यापीठ आणि कोल्हा-पूरचं ताराराणी विद्यापीठ या ज्या संस्था स्थापन केल्या त्या त्यांच्या आयुष्याला पुरल्या. दोन्ही संस्था मामांचं नाव चिरंतन करण्याइतक्या आता नावारूपाला आल्या आहेत. ताराराणी या संस्थेनं तर आक्कामामांच्या जीवनातील एक फार मोठी पोकळी भरून काढली आहे. आक्कांच्याच भाषेत सांगायचं तर " मला मूल नाही असं का म्हणता ? ताराराणीतल्या मुली कोणाच्या आहेत ? माझ्याच नाहीत का?" मामांचं कार्य आक्कानीही किती आणि कसं आपलं मानलं याचा हा एक अत्यंत बोलका पुरावा आहे. आक्कानीही आपलं सर्वस्व त्याला वाहून मामांच्या कार्याला एक आगळीच शोभा आणली आहे. स्त्रीच्या जीवनाबद्दल लिहि-ताना कै. गोविंदराव टेंब्यांनी हरिश्चंद्राच्या तारामतीच्या संदर्भात म्हटलं आहे, "सुकन्या, सुकान्ता, सुमाता, अखिल जगती मान्य." स्त्रीजीवनाच्या तिन्ही अवस्था आक्कानी आपल्या परीनं भूष-विल्या आहेत, यात शंका नाही.

मग आक्कांच्या वियोगाबद्दल शोक तो काय करायचा ? उलट आपलं सौभाग्यचिन्ह कपाळी मिरवत त्या देवाघरी गेल्या याचा आनंदच मानायला हवा. अर्थात चिरविरहाचं दुःख अपरिहार्य असलं,तरी चांगली माणसं देवालाही आपल्याइतकीच प्यारी असतात हे आपण ओळखायला नको का ?

आक्का देवाघरी चालल्या होत्या. त्यांना निरोप देत मी ताराराणीपर्यंत आलो. त्यांच्या मुलींनी त्याना पुष्पहार वाहिले आणि त्यांची महायात्रा सुरू झाली. आक्कांचा पार्थिव देह शाळेतून बाहेर पडला, तरी मला वाटलं आक्कांचा आत्मा नक्कीच या शाळेत घुटमळत असणार. मी वळून पाहिलं. शाळेच्या पायरीवर आक्का नेहमी बसायच्या, तिथंच मी त्यांच्याशी अनेकदा बोलत बसलो होतो. मला राहवलं नाही. मी धावत परत आलो आणि पायरीवर बसलो. किती वेळ बसलो होतो कोण जाणे वाटत होतं आक्का माझ्याशी बोलत आहेत. अनेकदा मी त्यांच्याशी संसाराबद्दल बोललो आहे. हरेक वेळी मौलिक सल्ला आक्कामामांनी मला दिला आहे. तोच आतून कोणीतरी आलं आणि म्हणालं, " दादा तुमचा फोन आहे. "

मी फोन घेतला. स्टूडिओतून निर्माते बोलत होते, "काय दादा,शूटिंग बंद करायचं का! " "नाही." मी अभावितपणे उत्तरलो "लायटिंग करायला सांगा मी आलोच." लगेच त्यांची गाडीही आली आणि मी स्टुडीओत आलो. का कोण जाणे सारखं मला वाटत होतं. आक्का माझ्या पाठीशी आहेत. गेल्याच नाहीत. जाणार नाहीत. . .

*

# ती. सौ. काकी

—प्राचार्य (डॉ.) अंबादास माडगूळकर

श्रावणाचा ओला महिना झिमझिम बरसत यायचा. ताराराणीच्या अंगणातली फुलझाडं मोहरून यायची, क्वचित सांजेला इंद्रधनुष्याचा सप्तरंगी पट्टा आभाळ भरून टाकायचा. मन प्रसन्न असायचं. ताराराणी विद्यापीठाच्या संगीत-हॉलमध्ये त्यावेळी सुंदर आरास केलेली असायची. रंगीबेरंगी कागदांच्या नक्षीदार झिरमिळचा, हारीनं पेटविलेल्या मेणबत्त्या... फळचावर सुबक आणि वळणदार अक्षरात लिहिलेलं असायचं..." रावसाहेब व्ही. टी. पाटील तथा काका यांचा अमुकावा वाढदिवस. हॉलमध्ये कौतुकानं जमलेले आम्ही काकांचे चाहते आणि मित्र आश्चर्याने म्हणायचे, " अरे, काका इतक्या वर्षाचे झाले वाटतसुद्धा नाही." खरेच, काका चिरतरुण आहेत. आज त्र्याहत्तराव्या वर्षातही शिवकालातील ढालीसारखी काकांची छाती ताठ पुढे असते. पावले तरी अशी पडतात की, दर पावलागणिक संकटांचा पायदळी चुरा होतो आहे असं वाटावं. " नमवी पहा धरणी हा चालताना " हे वर्णन काकाना अक्षरशः लागू पडतं.

वर्षामागून वर्ष गेली. दर वेळेला आमचा संवाद व्हायचा. अशा वेळी एखादा वडिलधारा शिक्षक आम्हाला सांगायचा,

" काकांच्या प्रकृतीचं श्रेय काकीना आहे, बरं का ?"

काकी म्हणजे रावसाहेब व्ही. टी. पाटील यांच्या धर्मपत्नी, सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथराव पाटील. आम्ही नजरेनं काकीना शोधायचे.काकी शांत आणि तृप्त बसलेल्या असायच्या. डोळचातील निरांजनं मंद आणि प्रसन्न तेवत असायची.

असे ५-६ वाढदिवस मी पाहिले. त्यांना आवर्जून हजर राहिलो. ती. काकांच्या गेल्या वाढदिवसाचा रंग मात्र विस्कटला होता. कारण या वाढदिवसाला ती. काकी नव्हत्या. घटप्रभेच्या दवाखान्यात त्यांचं निधन होऊन बरोबर एक महिना लोटला होता. यावेळी मी आणि गडहिंग्लजचे नगराध्यक्ष मा. डॉ. घाळी काकाना भेटायला गेलो. काका शोकानं भारावले होते आपल्या प्रिय पत्नीचं मोठं तैलचित्र त्यानी हॉलमध्ये मांडलं होते. स्वतः-साठी आणलेला हार काका त्या प्रतिमेला वाहून टाकत. डोळे तर सदाचेच भरलेले होते. कधी भान न राहून ते खाली टपटपत होते. जिव्हारी जखम झालेल्या पाखरासारखे काका तळमळत होते. अंतःकरणात चाललेला आकांत कितीही आवरला तरी डोळचा-बाटे बाहेर पडत होता. शब्दांचे पंख तर तुटून गेले होते. काका कितीतरी वेळा स्वतःशीच पुटपुटले. शब्द अधांतरी झेप घ्यायला तयार नव्हते. सरोज बंगल्यातलं "सरोज" काळानं श्रीहरीच्या पायी वाहण्यासाठी तोडून नेलं होतं. काका एकटे राहिले होते, अगदी एकटे !

आपल्या दिवंगत पत्नीस उद्देशून केलेलं एक स्वकृत काव्य काकानी आमच्या हाती दिलं. काका कधीकाळी कवी होते. राज-कारण आणि समाजकारण यांच्या धुमश्चक्रीतही हा झरा त्यांच्या हृदयात खोलवर कुठेतरी जिवंत होता. नियतीचा दुःसह घाव बसताच तो झरा उफाळून वर आला होता. काव्य अश्रूंनीच लिहिल्यासारखं भासत होतं. काकानी लिहिलं होतं,

नव्हते तुजला मला सोडुनी
जायाचे या जगातुनी
जीव गुंतला होता सगळा
तुझा देवते ! पतीजीवनी
माझ्याविण तू तुझ्याविना मी
नाहि कल्पिले कधी मनी

पण दैवाने हाय घडविले
घडू नये ते या जन्मी
स्वप्ने विरली आशा सरली
जीवन उरले जगायचे
कर्तव्याच्या पूर्तीसाठी
एक दिनी मग मरायचे

ती. सौ. काकी मुळच्या बेनाडीच्या. बेनाडीकर पाटलाचं घराणं खानदानी आणि प्रसिद्ध. दक्षिण महाराष्ट्रातलं एक अग्रेसर मराठा कुटुंब. शाहू छत्रपतीनी नियुक्त केलेले पहिले क्षात्रजगद्-गुरू हे बेनाडीकर पाटीलच. सौ. काकींचे चुलते ! महसूलमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांच्या प्रिय पत्नी कै. सौ. वत्सलादेवी याही याच घराण्यातल्या. बेनाडीचे लोक काकीना " आक्का " म्हणायचे आणि वत्सलादेवीना " ताई". आक्का आणि ताई यांचं भारी सूतगुत. आक्का घरी नसल्या की ताईकडं आणि ताई घरी नसल्या की आक्कापाशी अशी अभेद्य जोडी. ताईसमोर आदर्श आक्कांचाच.साऱ्या हयातभर वत्सलादेवी मोठ्या आदरानं आक्कांचं नाव काढीत. त्यांच्या शिकवणीचा उल्लेख करीत. बेनाडीकर पाटलांनी महाराष्ट्राला आणि दोन गुणवंत पुरुष दिलेत. द. महा-राष्ट्राच्या सहकारी क्षेत्रात महशूर असलेले खासदार गुलाबराव पाटील आणि सिने. दिग्दर्शक दिनकरराव पाटील. ही दोन्ही कर्तबगार मंडळी सौ. काकी यांच्या निकटवर्तीयांपैकीच. सौ. काकींचे लग्न १९२७ साली काकांशी लागलं. बेनाडीकरांची कन्या शिगांवकर पाटलांच्या घरी नांदायला आली. पहिल्यावेळी सासरी जाताना वडिल सौ. काकीना म्हणाले, "पोरी, आता तू दुसऱ्याची झालीस. तुझा पती हाच तुझा देव. त्याचा प्रपंच मन लावून नेटका कर. माझ्या घराकडं ओढ घेऊ नकोस." कुंकू भरल्या कपाळानं ओटीचा नारळ सांभाळीत, वाकून नमस्कार करीत काकीनी बापाचं बोलणं ऐकलं. पक्कं मनात धरलं आणि आमरण

पाळलं. हयातभर काकी माहेरी अशा गेल्या नाहीत. तशा गेल्या आल्या. पण पतीच्या घरावरचं छत्र त्यानी क्षणमात्र ढळू दिलं नाही.

ती. सौ. काकींशी लग्न झालं तेव्हा काकांच्या कर्तबगारीचा श्यामवर्ण वारू कोल्हापूर जिल्हयात दिग्विजय करीत चालला होता. राजबिंडे स्वरूप, विलक्षण बुद्धिमत्ता, महत्वाकांक्षी स्वभाव व पदरी असलेली वकिलीची सनद .... काका त्यावेळी खरोखर कोल्हापूरचे राजपुत्र शोभले असते. एकदा काका मला सांगत होते, " अर्ध्या रात्रीच एखाद्यावेळी वाटायचं की अरे, आज कोर्टात असा मुद्दा मांडायला हवा. " मग रात्रीचे उठून बसायचे दोन दोन वाजेपर्यन्त पुनः सकाळी सहा वाजता नित्य–क्रम सुरू व्हायचा. सौ. काकी नवऱ्याबरोबरही जागरण करा–यच्या. काका जागे तर काकीही जाग्या. कधी तक्रार नाही उणाअधिक शद्ब नाही. सारं अगदी मुकाट.

ती. काका सार्वजनिक क्षेत्रात शिरले. कोल्हापूर लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले. राजदरबारी मान्यता पावले. त्यानी टोलेजंग बंगला बांधला. इस्टेट केली. दारात मोटार आली. काकी बदलल्या नाहीत. त्यांची सारी महत्वाकांक्षा, मत्ता म्हणजे काकांच होते.

कुणी संकटात सापडलं, कुणी दुखावलं, सौ. काकी धावून यायच्या. सौ. काकींच्या एका बंधूनी वडिलांच्या इच्छेविरुद्ध विवाह केला. म्हातारा भडकला. पोराचं नाव टाकलं. काकीनी या निराधर भावाला जवळ बोलाविलं. त्याच्या पत्नीचं कोड–कौतुक केलं. स्वतःच्या हातातल्या सुवर्णाच्या बांगड्या त्या नवपरिणितेच्या हातात घालून काकी म्हणाल्या, " बाई ग, अण्णा (वडिल) रागावले, त्यांचं त्यांच्यापाशी. माझं घर तुझ्यासाठी उघडं आहे केव्हांही ये तुझं स्वागत आहे. " या लाडक्या वहिनीचं पहिलं बाळंतपणही त्यानीच केलं.

जुनं वळण. वर्षारंभी कोठी भरल्याखेरीज कधी काकीना बरं वाटायचं नाही. स्वतः उभा रहायच्या, वर्षाचा माल भरून घ्यायच्या. धान्य स्वच्छ करून पिपात भरायला लावायच्या. साहेबाना तृप्तीनं म्हणायच्या, " साहेब, घरची कोठी भरली की मला प्रसन्न वाटतं. " घर धालं भरलं झालं. काकी सर्वांना समभावानं वागवायच्या. नोकरचाकर, सोयरेधायरे, पाहुणे रावळे यांचा घरी अखंड राबता असायचा. पण कोणी कधी विन्मुख गेलं नाही. कुणाचा कधी पाणउतारा झाला नाही. काकी सर्वांना सांभाळून घ्यावयाच्या.

एक सत्य मात्र काकीना सारखं खुपायचं. त्यांच्या पोटी संतती झाली नाही. प्रत्यक्ष शद्बानं कधी बोलल्या नाहीत तरी संततीचं सुख आपल्या कर्तबगार पतीला आपण दिलं नाही याबद्दल काकी मनोमनी कष्टी असत. त्यासाठी त्यानी दत्ताची आराधना घेतली. सूर्योदयापूर्वी टेंबलाईदेवीशी धरणं धरलं.दर पौर्णिमेला काकी नरसोबावाडीला दत्तदर्शनाला जायच्या. काका सांगतात एखाद्या सकाळी, सकाळी उठल्याबरोबर दत्ताचं भजन आरती लागली की काकी सुखावून जायच्या. म्हणायच्या, " साहेब, आज किती बरं वाटतंय. उठल्या उठल्या दत्तमहाराजांचं भजन लागलंय. "

किती तरी लोकांनी काकांना दुसऱ्या लग्नाचा आग्रह केला. पण मूल नाही ही उणीव काकाना कधी भासलीच नाही. कुठलंही लहान मूल पाहिलं की काका आजही त्याच्याबरोबर रमतात, छोटचा बाबालोकांना खाऊ देतात. आपलं आणि पराचं हा भेद त्यांना कधी वाटतच नाही. त्यात सौ. काकींवर त्यांचं जीवापाड प्रेम होतं. सौ. काकीनीच हा विषय काढला की ते म्हणायचे, " सरोज, तुझ्यासारखी सर्वगुणसंपन्न आदर्श पत्नी मिळाली हे माझं भाग्य. मी दुसरं लग्न कशासाठी करू ? तुला सवत कशी आणू ? हा विषय पुन्हा काढू नकोस." यावर काकी कांही बोला–

यच्या नाहीत. बोलल्या तर म्हणायच्या, " साहेब, तुम्ही असं म्हणता त्यानं मला किती सुख वाटतं. आता पुन्हा नाही हा विषय काढायची. "

१९४५ साली काकांनी ताराराणी विद्यापीठ ही मुलींना शिक्षण देणारी संस्था काढली. शिक्षणकार्याला स्वतःला वाहून घेतलं. ताराराणी विद्यापीठाची वाढ हा काकांचा निदिध्यास झाला. संस्थेच्या देखण्या इमारती उभ्या झाल्या. शिक्षणाला वंचित अशा मुली ताराराणीच्या माडीवर वाढू लागल्या. दिवस-भर संस्थेच्या आवारात चिमण्यासारख्या कलकलू लागल्या. काकी आता खऱ्या अर्थाने " काकी " झाल्या. ताराराणीच्या विद्या-र्थिनीना काकी म्हणजे प्रतिमाताच झाल्या. पुढे श्रीमौनी विद्यापीठा-चाही विस्तार झाला.त्रिखंडात त्या संस्थेचं नाव झालं.काका खास-दार झाले. मानमरातबाचे कैक नजराणे "सरोज"बंगल्यांचा जिना चढून काकांच्या पायाशी झुकले. या साऱ्या आनंद सोहाळ्यात काकी असायच्या. पण सगळं लक्ष केंद्रित असायचं साहेबांच्या प्रकृतीवर. साहेब रात्री बेरात्री परगावहून यायचे. पण यायचे तेव्हा बंगल्यात दिवा जळत असायचाच. काकी प्रतीक्षा करीत थांबलेल्या असा-यच्या. काका दरवर्षी काही नवं धाडस अंगावर घ्यायचे आणि काकींचा जीव थोडा थोडा व्हावयाचा. ताराराणीचं कीर्ती कॉलेज ( कोल्हापूर ), गडहिंग्लजचं शिवराज कॉलेज ..... संस्थेच्या पाठीमागे बांधायला घेतलेलं प्रचंड लेडीज होस्टेल ....काकांच्या महत्वाकांक्षेला मर्यादाच नसायची. या महत्वाकांक्षी पतीबरोबर धावताना काकी थकून जायच्या. ताराराणी विद्यापीठाला काकानी स्वतःचं सर्वस्व देऊन टाकले. या त्यांच्या समर्पणातही काकी सहभागी झाल्या.

ताराराणीमध्ये नवरात्रात भवानीचा उत्सव करतात. एका वर्षी या छोटया मुली घरी काकींकडे गेल्या आणि हटून म्हणाल्या,

" काकी आमच्या उत्सवाला तुम्ही काही तरी द्या. " काकी हसून म्हणाल्या, " अग पोरीनो, माझ्याजवळ आता देण्यासारखं काही नाही. जीवमोलानं जपावा असा माझा एकच दागिना – माझा पती, तो तर केव्हाच तुम्हांला शाळेसाठी देऊन टाकलायच ! आता काय देऊ म्हणताय ? "

विनोदाचा भाग वगळला तर काकी बोलल्या ते शंभर टक्के सत्य आहे. काका आणि ताराराणी विद्यापीठ ही एकाच शक्तीची जणू दोन रूपं आहेत. खासदार होते त्या काळात काकाना दिल्लीला संसदेच्या आधिवेशनासाठी जावं लागे. पण काका त्या राजकारणाच्या मोहल्यात रमत नसत. ते हजेरी लावून लगेच कोल्हापूरकडे परतायचे. " दिल्लीच्या फाटीवर मी नुसता बॅट आपटून येतो, " असं काका थट्टेनं म्हणायचे.

अलिकडे दोनचार वर्षात काकीना संधीवाताचा विकार जडला होता. थोडीशी वार्धक्याची चाहूलही चेहऱ्यावर दिसू लागली होती. काका–काकी एकमेकाकडे रोज पहात असतील, पण " आता थकलो, " मुक्काम जवळ आला," असं कुणी कुणाला म्हणायचं कसं ? एके दिवशी हिय्या करून काका काकीना म्हणाले, "सरोज, आपलं आता वय झालं. माझं पहातीस, रोज शेकडो मैलाचा मोटारीचा प्रवास. वेळ काही सांगून येत नाही. मिळालेल्या मालमत्तेची काहीतरी विल्हेवाट लावली पाहिजे. ही मत्ता मी तुला कधीच देऊन टाकली आहे. तुला वाटेल तशी ती वाटून टाक, हवा तर दत्तक घे. हवे तर देवधर्माला दान कर. काय वाटेल ते कर. पण व्यवस्था करून टाक. " काकीनी जगावेगळा निर्णय घेतला. त्यानी आपली सारी इस्टेट ट्रस्ट करून ताराराणी विद्यापीठाला देऊन टाकली. राहता प्रासादतुल्य " सरोज " बंगला, पन्हाळच्याचा आलीशान बंगला, घरची भांडीकुंडी जमीनजुमला सारं सारं काकीनी ताराराणीला देऊन टाकलं, या इस्टेटीची

मोजदाद करताना काकी स्वतः उभ्या राहिल्या. नांदत्या लेकीला दान द्यावं तशी ताराराणीला सारी इस्टेट देऊन काकी निर्वेध झाल्या. लौकिकाची अलौकिक ही निरवानिरव करून काकी जणू फक्त उपकारापुरत्या जगू लागल्या.

तीन वर्षापूर्वी काकींच्या धाकटचा भावाला – विश्वास–रावाना कॅन्सरचा दुःसाध्य असा रोग जडला. विश्वासरावांचा संसार अर्धामुर्धा, पदरी कच्चीबच्ची. काकी या दुर्दैवी भावाच्या सेवेला पुढे झाल्या. स्वतःच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करून त्या विश्वास-रावांच्या उशाशी बसून असत. आपल्या भावाचं आयुष्य वाढावं म्हणून त्यानी दत्ताची आराधना अधिक उग्र केली. विश्वासराव डॉक्टरानी सांगितलेल्या मर्यादेपेक्षा दीडवर्ष अधिक जगले.काकींच्या श्रद्धा फळाला आल्या.

विश्वासराव वारल्यानंतर त्यांचे कुटुंब उघडे पडले. काकीनी वडिलांच्या इस्टेटीचा जो भाग त्यांच्या वाटचाला आला तो विश्वासरावांच्या पोरक्या मुलांना देऊन टाकला.

अलिकडे काकींची प्रकृती वारंवार बिघडायची. काका त्याना घेऊन घटप्रभेला जायचे. चार दिवस राहून काकी पुनः परत यायच्या. घटप्रभेला त्यांचा जीव रमत नसे. साहेबांचे जेवण-खाण, प्रकृती याची काळजी स्वतःच्या अंतिम आजारातही त्याना छळत होती. आजारी म्हणून काकींना आईबहीण, कोणी आप्त–स्वकीय भेटायला आले की काकी डोळे भरून सांगायच्या, " माझं काम कसंही होईल. पण साहेब प्रकृतीची काळजी घेत नाहीत. वेळेवर येत नाहीत. जेवत नाहीत. त्याचीच चिंता वाटते. "

या आजारातून काकी पूर्ण बऱ्या झाल्याच नाहीत. संध्या-छाया लांबच लांब पडत गेल्या. हळूहळू हातापायांना बधिरता

आली. जेवणासाठी तोंडी घास घेणंही जमेना. घास इतरांनी घालावा लागू लागला. कधीतरी साहेबानी आपल्या प्रिय पत्नीच्या मुखाकडे स्वतःच्या हातांनी घास नेला आणि काकीनी तोंड फिरविलं.

" सरोज, तू खाल्लं पाहिजेस, जेवलं पाहिजेस, जगलं पाहिजेस. माझ्यासाठी तर... " साहेब म्हणाले.

"साहेब, तुमची सेवा करता यावी म्हणून तर जगावसं वाटायचं. आता तुम्हालाच माझं करावं लागतंय. आता जगण्यात स्वारस्य नाही." शरिराला पराधीनता आली तशी जगण्याची शाश्वती त्यानी सोडली. एरव्ही काकींच्या लाडक्या ताराराणीचा रौप्यमहोत्सव पुढच्याच वर्षी येतो. पण हा सोहळा पहाण्यासाठी आता काकी असणार नाहीत.

या अवस्थेतच काकींचा ५८ वा वाढदिवस आला. मुली हटून बसल्या, "काकी तुम्ही आलं पाहिजे. शाळेत आम्ही वाढ–दिवसाची तयारी केलीय."

"अग, जिना उतरायचा अन् चढायचा म्हटलं की मरणाच्या वेदना होतात. आता या अवस्थेत कसला वाढदिवस? मी येणार नाही." काकी निग्रहानं म्हणाल्या. मुली काकीकडे हट्ट करून गेल्या, "काका, तुम्ही काकीना यायला सांगा, " काका म्हणाले, "सरोज, मुलींचा विरस करू नकोस, तू आलं पाहिजेस." काका एवढं म्हणाले आणि काकी यायला तयार झाल्या. आपल्या शारी–रिक वेदनांचा मागमूसही चेहऱ्यावर न दाखविता त्यानी मुलींचे कौतुक हसतमुखानं स्वीकारलं !

काकींच्या शेवटच्या आजारात त्याना घटप्रभेला हलवलं. रोज भेटायला माणसांची रांगच रांग लागू लागली. साहेबांच्या इष्टमित्रांनी घटप्रभेला गर्दी केली. काकींची वधिरावस्था वाढत

गेली. तरी काकी चिंता करायच्या, त्यांच्या उशापायशाला बसलेल्या गड्याला–बंडूला म्हणायच्या, " अरे, रोज इतकी माणसं जेऊन जायची. ज्वारीचं पीठ दळून आणायला पाहिजे ! "

ऑगस्ट महिन्यातल्या एका सकाळी मला गडहिंग्लजला कळलं की काकींची प्रकृती खूप बिघडली आहे. हातातलं काम टाकून मी घटप्रभेला पोचलो. दुपारची वेळ झाली होती. हॉस्पीटलचं आवार सुन्न होतं. घटप्रभेच्या हॉस्पीटलच्या लांबच लांब कॉरिडॉरमधून काकींच्या खोलीपाशी पोचलो. ती. काका प्रसन्न चित्तानं दारात उभे ेते. त्यांची चर्या पाहूनच मला वाटलं " संकट टळले आहे. "

"आता कसं काय ?" मी विचारलं.

" The danger is over " काका समाधानी वृत्तीनं म्हणाले. आम्ही खोलीत गेलो. काकींचा चेहरा थोडा शांत वाटत होता. पण डोळे मिटलेले होते. शांत झोप लागत होती.मनावरचा केवढातरी भार उतरला. थोड्यावेळानं गप्पा मारताना काकानी सांगितलं, " परवा मुंबईच्या डॉक्टर साठ्यांनी तपासलं आणि सांगितलं की, " She is sinking." मी हताश झालो. इष्टमित्रांना बोलावून घेतलं. अगदी धीरच सुटला. पण काल पुन्हा तपासलं, तर ते म्हणाले, "यांच्यात आश्चर्यकारक प्रगती आहे. वैद्यकशास्त्रात या प्रगतीचं कारण दाखविता येणार नाही. बाईंची Will-power दांडगी आहे. "

काकीना आपल्या पतीसाठी जगायचं होतं. ताराराणीसाठी जगायचं होतं. रौप्यमहोत्सवाचा सोहळा पाहायचा होता. आपल्या पतीच्या यशाचं चढतं शिखर पाहायचं होतं. त्या दिवशी संकट टळल्याच्या समाधानातच आम्ही होतो. मी होतो,मौनी विद्यापीठातले आमचे सहकारी मित्र होते. काकांचा संस्थासंसार या बातमीनं सुखावला होता.

—आणि एके दिवशी वीज कोसळावी तशी बातमी आली. " काकी गेल्या! " सरोज बंगल्याच्या दारात अंत्यदर्शनासाठी दाटी झाली होती. करवीरातले प्रतिष्ठित तर होतेच पण काकींच्या दातृत्वाची आठवण काढीत डोळे पुसणाऱ्या फाटक्या, मलीन वस्त्रातल्या स्त्रियाही होत्या. पोपटी रंगाच्या युनिफॉर्म–मधल्या ताराराणीच्या रडवेल्या कन्या होत्या, शिक्षक होते, शिक्षिका होत्या, सारेजण शोकानं भारावले होते.

सौ. काकींचा पार्थिव देह हॉलमध्ये ठेवला होता. त्यांची मुद्रा नेहमी सारखी स्नेहाळ आणि शांत होती. " वासांसि जीर्णानि " हा गीतेतला श्लोक पुटपुटत मी त्यांच्या देहापुढे नतमस्तक झालो आणि सुन्न मनाने पायऱ्या उतरलो.

संस्थेच्या कामानिमित्त काकांकडे हल्ली वारंवार जावं लागतं. त्यांच्या विस्तीर्ण बंगल्यातली दालनं आता मोकळी वाटतात, अधिकच मोठी भासतात. काकांच्या परिवारातली मंडळी त्यांची चुणचुणीत मानसकन्या कु. कांचन ही मंडळी मधूनमधून आढळतात. पण " गृहं तु गृहिणीशून्यं " अशी घराची अवस्था हटत नाही. काकींच्या आठवणी काढून काका लहान मुलासारखे रडतात. सौ. काकींच्या आवडीनिवडी, रुसवेफुगवे, याकडे आपल्याला संस्थेच्या व्यापामुळे हवे तेवढे लक्ष देता आले नाही ही जाणीव काकांना छळत असते. " कार्येषु मंत्री, भोज्येषु जननी " अशा आपल्या आदर्श पत्नीला द्यावं तेवढे सुख आपण दिलं नाही या जाणीवेनं काकांसारखा धीरपुरुषसुद्धा व्याकूळ होऊन जातो. त्यांचं सांत्वन कसं करावं?

—नेहमी सारखा सूर्य उगवतो. सरोज बंगल्याच्या ताव–दानातून उन्हाचे अरुण रंगाचे कवडसे आंत येतात. आता, काका यावेळी उठलेले असतात. त्यांच्या झोपायच्या खोलीत लावलेल्या काकींच्या मोठ्या तैलचित्रासमोर ते सुस्नात होऊन उभे असतात.

तदाकार होऊन आपल्या प्रिय पत्नीची आठवण करतात.काकींच्या आवडीच्या भजनाच्या रेकॉर्डस् टेपवर लावलेल्या असतात.
गाणं वाजत असतं,

"धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ।"

बाहेर दिवस उजाडत असतो आणि ------- आपल्या दीर्घ दांपत्यजीवनाचा चित्रपट भरल्या डोळ्यांनी मन:पटावर पहात काका उभेच असतात.

*

# सौ. काकी अेक जीवननिष्ठा ?

–सर्जेराव पाटील

लहानपणी पाहिलेल्या आमच्या गावच्या शिवालयातील आठवण माझ्या अंत:करणात कायमची कोरली गेली आहे. त्या शिवालयाच्या एका बाजूला मुलांची प्राथमिक शाळा होती· दुसऱ्या बाजूला शिवालयाचे मठाधिपती स्वामी राहात असत· शिवालयात पायऱ्यावर चढून जाताना मंदिरासमोर डौलाने बसलेला नंदी दिसे आणि समोर गाभाऱ्यात अनेक नंदादीपानी सुशोभित झालेली महादेवाची पिंडी आणि त्यावरील शिवाच्या मुखवटचाचे दर्शन घडे. त्याबरोबरच तेथील जळणाऱ्या उदवत्तीचा मंदमधुर सुवास मन मोहित करी.

प्रसिद्ध विद्यासेवक आणि थोर नेते श्रीयुत व्ही. टी. पाटील आणि त्यांच्या पत्नी सौ. सरोजिनीदेवी यांचा संसार पहाताना मला नेहमी या शिवालयाची आठवण यायची. श्री. व्ही. टी. पाटीलांच्या सहवासात अनेक वर्षे घालविली आहेत. त्यांच्या गुणदोषाची पूर्ण कल्पना मला आहे. त्यांचे जीवन म्हणजे एक झंझावात आहे. त्यात अनेक स्थित्यंतरे आहेत. अनेक परिवर्तने आहेत व अनेक धाडसी निर्णय आहेत, श्री. व्ही. टी. पाटील संस्थानी राजकारणात श्रेष्ठ ठरले. लोकशाहीच्या काळात त्यांनी आमदारकी खासदारकी मिळवली. लोकानी त्याना डोक्यावर घेतले. कोल्हापूर जिल्ह्यात काँग्रेस संघटना बहुजनसमाजमय करण्यासाठी त्यानी जिवाचे रान केले. तथापी त्यांच्या जीवनाचा बराचसा भाग शिक्षणकार्याने व्यापलेला

आहे. श्री. व्ही. टी. पाटील यानी सर्वस्वाचा त्याग करून फक्त शिक्षणकार्यालाच आपले जीवन वाहिले. शैक्षणिक संस्था चालविणे आज सरकारी अनुदानामुळे सहजसाध्य वाटत असले तरी एकेकाळी रावसाहेब श्री. व्ही. टी. पाटील यानी चालवि-लेल्या शिक्षणसंस्था चालविणे म्हणजे हिमालय डोक्यावर घेण्याची किमया करण्यासारखेच होते. शिक्षणसंस्था चालविणाऱ्याला नेहमी याचकाची भूमिका घ्यावी लागे. याचकाची भूमिका घेणे हे श्री. व्ही. टी. पाटलांच्या स्वभावाविरुद्ध आहे. याचक म्हणून कोणाच्या दारात उभा राहाणे म्हणजे मरणप्राय दुःख होय. म्हणूनच शिक्षणसंस्था चालविण्यासाठी श्री. व्ही. टी. पाटील यानी केवळ याचकाची भूमिका न घेता आपल्या सर्व बुद्धि-मत्तेचा, कुशल नेतृत्वाचा आणि विपुल मित्रपरिवाराचा मोठ्या चतुराईने उपयोग करून घेतला. हे सर्व कार्य उभा करीत असताना त्यानी स्वतःच्या संसाराचा कधी विचार केला नाही. स्वतःच्या पत्नीचा विचार केला होता की नाही हे कळण्यास मार्ग नाही. मित्रमंडळीत गप्पा गोष्टी करताना श्री. व्ही. टी. पाटील सहज बोलून जात, " आम्ही आमच्या जीवनाचे राष्ट्रीयी-करण केलेले आहे. सर्व जीवन आमच्या शिक्षणसंस्थेच्या संसाराला वाहिले आहे. या शिवाय दुसरा संसारच आम्हाला नाही." श्री. व्ही. टी. पाटील यांच्या त्या सहज बोलण्यात त्यांच्या जीवनाचा खोल अर्थ कसा ओतप्रोत भरलेला आहे याची इतरांना कल्पना येणार नाही. श्री. व्ही. टी. पाटील यांच्या या म्हणण्याला सौ. सरोजिनीदेवी आपल्या नेहमीच्या मंदस्मिताने साथ देत. या मंद-स्मितात त्यांच्या अंतःकरणाचा मोठेपणा मला जाणवत असे.

सौ. सरोजिनीदेवी म्हणजे शिवालयात तेवत राहाणारा नंदा-दीपच होय. उदबत्ती स्वतः जळते आणि सर्व वातावरण सुगंधित करते. तद्वतच सौ. सरोजिनीदेवीनी म्हणजे आमच्या काकीनी श्री. व्ही. टी. पाटील यांचे जीवन सुगंधित केले आहे. श्री. व्ही.टी.

पाटील याना उपमाच द्यायची झाली तर शिवाचीच द्यावी लागेल. हा शिव व्याघ्रचामडे वस्त्र म्हणून ल्यायला आहे. त्याच्या गळयात अनेक असुरांचो मुंडकी लटकताहेत. हातात, त्रिशूळ डमरु कंठात जहरी वीष पचविण्याची शक्ती आहे आणि स्वर्गातून कोसळणाऱ्या भागीरथीचा प्रवाह जटेत तोच रोखून धरतो. तो चिताभस्म ल्यालेला आहे. त्याचे वास्तव्य स्मशानात आहे. म्हणजे तो विरक्त आहे. इतके असूनही त्याच्या ठिकाणी नृत्य, नाटय, संगीत इत्यादी विविध ललित कलांचा संगम झाला आहे. त्याच्या तांडव नृत्याने सारी पृथ्वी गद्गद् हलते. असा शिव फक्त उमेलाच शांत होतो. ही किमया आपल्या स्त्रीसुलभ भावनेने आणि मृदुत्वाने केवळ उमाच करू शकली. म्हणून ती जगन्माता बनली. श्री. व्ही. टी. पाटील यांच्या जीवनात काकीनी सदैव उमेचेच कार्य केले आहे. अनेक कठीण प्रसंगी श्री. व्ही. टी. पाटील याना असामान्य धैर्य दिले आहे.त्यांच्या जीवनातील अनेक मोठे कटू प्रसंग काकीनी अगदी लीलया टाळले आहेत. जणू काय कधी काही घडलेच नाही. पतीजीवनाशी अशी समरस झालेली पत्नी जन्मोजन्मी लाभावी म्हणून प्रत्येक पुरुषाने वटसावित्रीच्या व्रतासारखे एखादे व्रत करावे.

काकीना राजकारणात रस नव्हता; पण लोकांचे भले व्हावे ही आंतरिक तळमळ होती. कोणत्याही वादग्रस्त प्रश्नाचा किंवा त्यासंबंधीच्या चर्चेचा त्याना तिटकारा होता. वादापेक्षा सलोखा नांदावा, सहकार्य वाढावे आणि सर्वांनी सलोख्याने रहावे ही त्यांची भावना होती. पैपाहुण्यांचे आदरातिथ्य करावे तर काकीनीच !

अनेक कामासाठी श्री. व्ही. टी. पाटलाना रात्री बेरात्री प्रवास करावा लागे. कोणत्याही प्रवासात काकी सर्वांना वात्सल्यपूर्णतेने दहीभात देत आणि 'सांभाळून जावा' एवढेच उद्गार

काढीत. त्यांच्या या उद्गारात सदिच्छा भरलेली असे. तसेच सुरक्षिततेची हमीही वाटत असे. काकी देवभक्त होत्या. प्रवासाला बाहेर पडल्यानंतर आम्ही येईपर्यंत त्या देवापाशी आमच्या सुरक्षिततेसाठी अखंड प्रार्थना करीत बसणार याची खुणगांठ बाळगावी ! त्यानी जीवनात कधी खंत बाळगली नाही. संसारातील अपुरेपणा कधी त्यांच्या अंतःकरणाला जाणवला नाही. पतीचे सुख तेच आपले सुख, पतीचे यश तेच आपले यश, पतीचे कार्य तेच आपले कार्य असे मानून समर्पित जीवन जगणाऱ्या त्या एक आदर्श महिला होत्या. पतिजीवनात स्वतःचे व्यक्तिमत्व विसरून पूर्णपणे मिसळून जायचे ही गोष्ट सामान्य नव्हे. सामान्य माणसाला ती साध्य होणारी नाही. त्यासाठी असामान्य त्यागाची भूमिका असावी लागते. ती भूमिका सौ. काकींनी हसतमुखाने पार पाडली आहे.

आज काकींच्याशिवाय श्री.व्ही.टी. पाटलांचे जीवन एकाकी झाले आहे. काकी आयुष्यभर श्री. व्ही. टी. पाटलांच्या सानिध्यात हिमालयाच्या सावलीप्रमाणे वावरल्या. पण या सावलीमुळेच व्ही. टी. पाटलांच्या झंझावती जीवनाला एक प्रकारचा गारवा लाभला होता. त्यांचे जीवन प्रसन्न झाले होते. त्यांच्यापासून त्याना स्फूर्ती लाभली होती. प्रचंड लोककार्याचा भार सांभाळण्यासाठी शक्ती लाभली होती. त्यांच्या जीवनाची शक्ती आणि स्फूर्ती म्हणजे काकी ! त्यांच्या जीवनातील पावित्र्याची अखंड तेवणारी ज्योत म्हणजे काकी ! त्यांच्या जीवननिष्ठेचा उज्वल प्रकाश म्हणजे काकी! त्या प्रकाशाने केवळ श्री.व्ही. टी. पाटील यांचेच नव्हे तर त्यांच्या सर्व शिक्षण व अन्य क्षेत्रातील मित्रपरिवाराचे जीवन प्रकाशमय केले आहे. सौ. काकींच्या पवित्र स्मृतीला माझे विनम्र अभिवादन !

★

# मा - एक समर्पित जीवन

—कु. कांचन विश्वनाथ पाटील

गिरसप्पाचा रम्य धवधबा. म्हैसूरसारखे सुंदर शहर. अर्नाकुलमसारखे निसर्गाच्या कोंदणात वसलेले शहर आणि कन्याकुमारीची ती अवर्णनीय शोभा पाहून मदुरेला येईपर्यंत दिवस कसे मजेत गेले. किती उत्साह वाटत होता आम्हाला ! पण पपा मात्र शांतच होते. मग मदुरेचे मीनाक्षी मंदिर पहायला गेलो. किती भव्य मंदिर आहे ते. तिथल्या प्रचंड खांबावरील आकर्षक कोरीव काम, छतावरील मोहक रंगकाम आणि त्या प्रचंड मूर्ती पाहून कसे बावरल्यासारखे झाले होते. भव्यतेने भांबावलेल्या आमच्या नजरा चहुबाजू निरखीत होत्या.

इतक्यात आरतीचे स्वर कानी आले म्हणून आम्ही मीनाक्षीच्या गाभाऱ्यात शिरलो. आरती संपण्यापूर्वीच पपा बाहेर निघून गेले. देवभोळे पपा आरती संपण्यापूर्वी बाहेर जाणे शक्यच नव्हते. पण मला जे अशक्य वाटत होते तेच घडत होते. म्हणूनच आम्ही सारेजण पटकन बाहेर आलो. मन म्हणत होते, ' पपाना प्रवासाचा शीण तर आला नसेल ना ? का त्यांच्या पोटात दुखत असेल ?' बाहेर येऊन पाहतो तो पपा एका स्तंभाला टेकून बसले होते. मी गडबडीने पपाना विचारले, ' पपा काय झालं ? तुम्ही मधेच का बाहेर आलात? तुम्हाला थकवा वाटतो का?' आणि मी पपांच्या चेहऱ्याकडे पाहिले. पाण्याने डबडबलेले पपांचे डोळे कुणासाठी रडत होते ? ' पपा रडता तुम्ही ?' नकळत माझ्या तोंडून शब्द गेले आणि पपानी आवरून धरलेला हुंदका बाहेर फुटला. गाला–

वरुन आसवे ओघळली, "कांचन, तुझ्या मांची आज तीव्रतेनं आठवण येते. आजपर्यंत मी खूप प्रवास केला. प्रत्येक प्रवासात त्यांची साथ मला लाभली. या प्रवासाला घरुन निघाल्यापासून मला त्यांची उणीव भासत होती, चुकल्या चुकल्यासारखं वाटत होतं. दहा वर्षापूर्वी त्या माझ्याबरोबर दक्षिणेतल्या प्रवासाला आल्या होत्या. हे मिनाक्षी मंदिर पाहून तुझ्या देवभोळ्या मा किती समाधानी बनल्या होत्या . . . . पुढे पपाना बोलवेना. मांच्या असंख्य आठवणी पपांच्यासमोर उभ्या राहिल्या. पपा ढसढसा रडत होते. कोणत्याही संकटावर न डगमगता मात करणारा एक धीरोदात्त पुरुष आज उन्मळून पडलेल्या वटवृक्षासारखा विकल झाला होता.

खरेच ! मा पपाना सोडून गेल्या तेव्हापासून पपांच्या चेहऱ्यावरचे हास्य पार मावळून गेले आहे. वयाच्या एकोणसत्तराव्या वर्षीदेखील एखाद्या विशीतल्या तरुणाच्या उत्साहाने चालणारे पपा आज म्हातारे झाल्यासारखे वाटतात. दोन वर्षापूर्वीच्या पपांच्या सतेज आणि प्रसन्न चेहऱ्यावर आज असंख्य सुरकुत्या जमा झाल्यात. मला माझ्या संस्थांच्यासाठी अमुक करायच आहे. असे मोठ्या दिमाखाने सांगत रोज नवी नवी स्वप्ने पहाणारे पपा आज म्हणायला लागलेत, ' कांचनबेटा माझ्यानंतर कुणी काही करो वा न करो. पण मी दोन्ही संस्थांची हाती घेतलेली कामे मात्र आता लवकर पूर्ण झाली पाहिजेत. ' दोन वर्षात पपांच्यात इतका बदल घडला तरी कसा ? आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. कारण मांच्या जाण्याबरोबरच पपांची शक्ती आणि स्फूर्ती निघून गेलीय. मा गेल्या आणि पपा पोरके झाले. या पोरकेपणाच्या जाणीवेनेच पपाना पार बदलून टाकले आहे.

होय. हे खरे आहे. वयाच्या पहिल्यावर्षी आईविना पोरक्या बनलेल्या माझ्या पपाना लग्नानंतर मानी मातेच्या मायेने सांभाळले होते. ही कबुली पपांच्या तोंडचीच आहे. एक प्रसंग मला

आठवतो. अलिकडे मांची प्रकृती बरी नसल्याने मा झोपून असा–यच्या. त्यादिवशी दुपारी पपाही घरीच होते. मी माना ‘ श्रीमान योगी ’ कादंबरी वाचून दाखवीत होते. आईविना पोरक्या बन–लेल्या संभाजीच्या मन:स्थितीचे रणजित देसाईनी केलेले वर्णन वाचून झाल्यावर कुतुहलाने मी पपाना विचारले, ‘ पपा, लहान–पणापासून तुम्हाला आई नाही म्हणून तुम्हाला काय वाटतं? ’ त्यावेळी चटकन पपा म्हणाले, ‘ कांचन कुणी सांगितलं मला आई नाही म्हणून?’ मी आश्चर्याने पपांच्याकडे पाहू लागले. कारण मला निश्चितपणे आठवण होते की ताईसाहेबानी आणि त्याच–प्रमाणे पपानीही गप्पांच्या ओघात बऱ्याचवेळा मला सांगितले होते की आमची आई लहानपणीच वारलीय. मग पपा आज असे कसे म्हणत होते? पपा काहीतरी बोलून गेले की मीच काहीतरी ऐकले? माझ्या भांबावलेल्या अवस्थेकडे पहात पपा उद्‌गारले, ‘ कांचन, सरोजच माझी आई आहे. ज्याप्रमाणं सरोजनं मला पत्नी म्हणून अमाप सुख दिलं, त्याचप्रमाणे कन्या बनून माझी सेवा केली आणि माता बनून माझा सांभाळ केला. म्हणूनच मी जगाला आज या अवस्थेत दिसू शकलो. ’ पपांची ही कबुलीच सांगते की आज त्यांच्यात जमीन अस्मानाचा फरक का झाला आहे. मांच्या जाण्याबरोबरच पपांची माता, कन्या आणि पत्नी त्याना सोडून गेलीय. पपा खरोखरच अनाथ झालेत.

पपा पूर्णतया जाणून होते की मांच्या जाण्याने आपल्याला जीवन असह्य होणार आहे. म्हणूनच मांच्या आजाराने जेव्हा उचल खाल्ली तेव्हा पपानी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अहोरात्र पपा मांच्या उशाजवळ बसून होते. घटप्रभा हॉस्पिटलमध्ये निष्णात डॉक्टरांची ट्रीटमेन्ट चालू होती, तरीही पपानी मुंबईहून डॉक्टर बोलावले. डॉक्टर आले आणि डॉक्टरनी पपाना सांगितले, ‘आप-ल्याला कुणा पाहुणमंडळीना भेटायला बोलवायचे असेल तर बोलवा. आता आशा नाही. ’ डॉक्टर निघून गले. पपांच्या चेहे–

त्याकडे पाहावत नव्हते. मामात्र शांत होत्या. डॉक्टरनी सांगण्यापूर्वीच त्याना मृत्यूची चाहूल लागली असावी. कारण लगेच मानी पपाना हाक मारली. पपा मांच्या उशाशी बसले. मी मांचे पाय चेपीत होते. मा सांगत होत्या, ‘ साहेब, मी या आजारातून आता उठत नाही. तुम्ही स्वतःची काळजी घ्या. खूप दगदग करू नका ... माना पुढे बोलू न देताच पपा म्हणाले, ‘ सरोज, माझ्यासाठी तुला जगलचं पाहिजे. तू मला टाकून जाऊ नकोस. मनाचा निश्चय कर. तुझ्याविना मी पोरका होईन. ’ पपा कसेबसे इतके बोलून गेले आणि पपांच्या डोळ्यातले पाणी मांच्या कपाळावर ओघळले. मानी जड हाताने पपांचे अश्रू पुसले आणि नेहमीप्रमाणेच त्या अबोल झाल्या. तो दिवस गेला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टर आले. डॉक्टरनी तपासणी केली आणि ते मांच्याकडे विस्मयाने पहातच राहिले. डॉक्टर मांच्याकडे असे काय पहात होते ? आम्ही सारेचजण अवाक् होऊन पहात होतो आणि डॉक्टर पपाना सांगू लागले, ‘ पाटीलसाहेब, तुमच्या पत्नीची इच्छाशक्ती जबर दिसते. मला वाटलं नव्हतं की कालची रात्र त्या काढतील म्हणून. म्हणूनच मी तुम्हाला नातेवाईकांना बोलावून घ्यायला सांगितलं होतं.’ मामात्र नेहमीच्याच शांत नजरेने पपांच्याकडे पहात होत्या. जणू त्याना म्हणायचे होते माझ्या या पतीसाठीच मी जगले आहे आणि ते खरेही होते. पतीसाठी जवळ येऊन ठेपलेल्या मृत्यूशी त्यानी झुंज दिली होती. केवळ पपांच्यासाठी तिथून पुढचे आठ दिवस शरिराला असह्य वेदना होत असताही मा हसत होत्या. स्वत:ला ओळीने तेवीस दिवस आणि रात्री झोप नसतानाही मा पपाना विनवून सांगत होत्या, ‘ साहेब, तुम्ही झोपा. मला आता झोप येईल. ’ शेवटी मृत्यू हा जीवनाच्या नदीतील कुणालाही न फोडता येणारा अवघड भोवरा आहे. या भोवऱ्यात सापडूनही मानी जोराने पोहोण्याचा प्रयत्न करून पपांच्यासाठी त्यातून बाहेर येण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण आठ दिवसांनी या भोवऱ्याने

माना आपल्यात सामावून घेतले. मा शरिराने निघून गेल्या पण मला खात्री वाटते की मांचा आत्मा मात्र निश्चितपणे पपांच्या भोवतीच फिरत असेल.

मा मृत्यूला घाबरल्या नाहीत. असह्य वेदनांनी सांधे सतावत होते तरी त्या कधी रडल्या नाहीत. पण एकदा मात्र मा रडल्या. खूप खूप रडल्या. मा तेव्हा अंथरुणावर झोपून असायच्या त्याना स्वतःहून उभा रहाता येत नव्हते. घरी बंडू शिपाई होता. तो माना अगदी व्यवस्थित धरून न्यायचा. पण एकदा तो स्वतःच्या लग्नासाठी गावी गेला. त्या दिवशी माना अंथरुणावर पडून कंटाळा आला होता. त्याना थोडसं चालावसं वाटतं होतं. मी त्याना उठून बसवले. पण उभ्या राहिल्या की त्यांचा तोल जायचा. त्यामुळे मला एकटीला काही त्याना सांभाळून नेता येत नव्हते. म्हणून मी पपाना हाक मारली. पपा आणि मी, आम्ही दोघांनी माना हळूच उभे केले. माना फिरायचे होते. पण मा पटकन खालीच बसल्या आणि ओक्साबोक्सी रडू लागल्या. आम्हाला काहीच कळेना. पपानी विचारले, ‘सरोज, काय झालं? का रडतेस ?’ अपराधी नजरेने पपांच्याकडे पहात मा म्हणाल्या, ‘साहेब, खरं म्हणजे मी तुमची सेवा करायची. पण तुम्हालाच माझ्या सेवेला उभं रहाव लागतय.’ आजवर पतीला देव मानून त्याची मनोभावे सेवा करणाऱ्या मा आज असहाय होऊन रडत होत्या. हो! मानी पपाना देवच मानले होते. त्यांच्या वडिलांची ती शिकवण होती. लग्नानंतर सासरी जाताना आशीर्वादासाठी वाकलेल्या आपल्या मुलीला आण्णा सांगत होते, “कमळाताई, आता पती हाच तुझा देव. त्याचीच भक्ती कर. सेवा कर. आता त्याचं घर तेच तुझं माहेर आणि तेच तुझं सासर.” पित्याच्या या सांगण्याचा मानी कधीच अवमान केला नाही. लग्नानंतर माहेरपणाची गोडी चाखायला त्या माहेरी कधीच गेल्या नाहीत.

सदैव पतीची सेवा करण्यात आणि त्याला साथ देण्यातच त्यानी आनंद मानला. हाच खरा पत्नीधर्म नव्हे का ?

आणखीही एक प्रसंग मला आठवतो. संस्थेच्या कामासाठी पपाना मुंबईला जायचे होते. पण माना खूप ताप येत होता म्हणून पपानी मुंबईला जाण्याचे रहित केले होते. पण मुंबईहून पपाना ट्रंक्कॉल आला. ट्रंक्कॉलवर पपा सांगत होते, ' माझ्या पत्नीला ताप येतोय. तिला बरं वाटल्यावर मी येईन. काम महत्वाचे असेल तरी मी येऊ शकत नाही. ' पपानी रिसिव्हर खाली ठेवला आणि पपा मांच्या जवळ येऊन बसले. मांच्या अंगात १०३ अंश ताप होता, डोळयावर झापड येत होती. तरीही मा पपाना मुंबईच्या कामाबद्दल विचारत होत्या. पपानी कोणते काम ते सांगितले आणि लगेच मांच्या तोंडून शब्द बाहेर पडले, ' साहेब तुम्ही उद्या मुंबईला जा. माझी काळजी करू नका. संस्थेच्या कामासाठी तुम्हाला गेलंच पाहिजे. मी सांगते म्हणून जा. तुम्ही याल तेव्हा मी बरी झालेली असेन. ' आणि रात्री मानी पपांची बॅग भरायला सांगितली. सकाळी पपा निघाले तेव्हा व्हील चेअरवर बसून मा गच्चीत आल्या पपाना प्रेमाने निरोप द्यायला. पपा काळजीत होते. पण मामात्र हसत होत्या, पपाना प्रवास सुखाचा जावा म्हणून. म्हणूनच पपा आज अस्वस्थ होतात. पपाना आज सतत मांची उणीव भासते.

मा फारशा शिकलेल्या नव्हत्या. पण नवऱ्याला रे म्हणून हाक मारणाऱ्या आज जरा तुम्हीच भात टाका हो, असे सांगणाऱ्या आणि 'आज माझं डोकं दुखतय, तुम्ही ऑफीसला जाऊ नका' असे सांगणाऱ्या आजच्या सुशिक्षित स्त्रीला माझ्या मा या प्रसंगाद्वारे बरेचसे काही शिकवून गेल्यात असे नाही का वाटत तुम्हाला ?

पपा नेहमी म्हणतात, ' सरोज एक देवता होती. ' खरेच, देव देव म्हणजे तरी काय ? देव या श्रद्धास्थानाकडून आपल्या

काय अपेक्षा असतात ? देव म्हणजे त्या ठिकाणी पवित्रता असली पाहिजे, प्रसन्नता दिसली पाहिजे आणि कृपाळू दृष्टी बसली पाहिजे असेच ना ? मग माझ्या मांच्या ठिकाणी हे सारे काही होते. त्या खरोखरच देवता होत्या. त्यांचे मन पवित्र होते. भाबड्या स्वभावाच्या होत्या त्या ! चेहरा कसा प्रसन्न आणि शांत असायचा. त्या कृपाळू तर होत्याच पण त्यांचे हृदयही अथांग प्रेमाने ओतप्रोत भरलेले होते.

या त्यांच्या गुणांनीच त्यानी कित्येकांना सुखावले आहे. गरिबांची त्यानी सदैव चिंता वाहिली. घरच्या गड्यामाणसांना कधी घर परके वाटू दिले नाही. त्यांच्या नात्याच्या ना गोत्याच्या अशा माणसांना जवळ करून त्यांचे कोडकौतुक केले. मातेच्या ममतेने त्यांचा सांभाळ केला. तासन्तास देवपूजा केली. साऱ्या नातेवाईकांना या ना त्या मार्गाने मदत केली.

पण या सर्वांच्याकडून माना काय मिळाले ? ज्या गडीमाणसांची त्यानी सदैव चिंता वाहिली त्यानीच त्या अंथरूणावर खिळल्या तेव्हा घर लुटून न्यायचा घाट घातला. ज्या देवांची त्यानी मनोभावे पूजा केली त्याने त्यांच्या मनाची इच्छा पुरी केली नाही. त्यांना मूल दिले नाही. त्यांना वारस मिळाला नाही. नातेवाईकांच्याबद्दल बोलायचे झाले तर विमलमावशी, आजी, ताईसाहेब, प्रसंगी आईसाहेब, बाळदादा आणि जयसिंगमामा यांच्याखेरीज त्यांच्या आजारपणात कुणीच धावून आले नाहीत. त्यानी जवळ केलेल्या माणसांनी तर कमालच केली. कोणत्याही प्रकारचे सुख देण्याऐवजी या लोकांनी दु:ख मात्र त्यांच्या वाट्याला दिले. आजारपणी मांची सेवा करण्याची तर राहोच पण त्यांच्यावर शाब्दिक प्रहार मात्र केले. हे कडू असले तरी सत्य आहे. या सत्याला सामोरे जाताना मा मात्र कधीच रागावल्या नाहीत. पायदळी चुरणारी फुले चुरणाऱ्या पायांना नेहमी आपला सुवासच

अर्पण करतात त्याप्रमाणेच मानी मात्र सदैव या लोकांचे भलेच चिंतिले. किती मनाचा मोठेपणा हा !

याच मनाच्या मोठेपणाने त्यानी आपली सारी इस्टेट ताराराणी विद्यापीठाला देऊन टाकली. पतीने ज्याचा ध्यास घेतला त्या ध्यासाच्या पूर्तीसाठी पत्नीने सर्वस्वाचा त्याग केला. आपल्या समर्पित जीवनावर या महान त्यागाने त्यानी कळसच चढवला आहे. मा समर्पित जीवन जगल्या, तन आणि मन पतीलाच अर्पण केले आणि धन ताराराणी विद्यापीठाला देऊन टाकले. जीवन पराकोटीचे समर्पित असेल तर ते कधीच जीर्ण होत नाही. चंद्र कधी जुना होत नाही, सूर्याला म्हातारपण येत नाही आणि दर्या कधी संकोचत नाही. मांचे जीवनही असेच प्रकाशमान रहाणार. मा म्हणजे एक शांत ज्योत होती. दुसऱ्यासाठी प्रकाशणारी. त्या ज्योतीत दिव्यत्व होते. त्या दिव्यत्वाला माझे शतशः प्रणाम.

# कै. सौ. सरोजिनीदेवी ऊर्फ आक्का

---

– ज. आ. पाटील, बेनाडीकर

नागपंचमीचे माहात्म्य लाभलेले शिराळा व श्रीसिद्धेश्वराच्या परिसरातील बेनाडी यांचा ऋणानुबंध आमच्या आईवडिलांच्या विवाहातून जोडला गेला. आम्ही बेनाडीच्या वतनदार पाटील घराण्यातील तर आई शिराळच्या शिंदे घराण्यांतील व त्यांचे ज्येष्ठ अपत्य म्हणजेच आमच्या आक्का.

आक्कांचा जन्म २८ एप्रिल १९०९ इ. रोजी झाला. त्यांचे माहेरचे नाव कमल, त्यांच्यानंतर दिनकर, त्यानंतर मी, नंतर विश्वास व शेवटी विमल (हल्लीच्या सौ.राजलक्ष्मी जाधव) अशी एकूण आम्ही पाच भावंडे.तीन भाऊ व दोन बहिणी.

आक्कांच्याबद्दल लिहिताना आठवण येते ती ताईंची ( कै. वत्सलादेवी देसाई–माहेरचे नाव बनुताई– कै. दाजी अर्जुन यांची सुकन्या ). आक्का सर्वात वडील तर ताई त्यांच्याहून बऱ्याच लहान–बेनाडी गावातील आम्हा भाऊबंदातील सर्व मुलीत सदा एकत्र असणारी जोडी. ताईनी आदर्श मानला तो आक्कांचाच. ताईना काटा बोचला तर त्याची कळ आक्काना येई व आक्काना काही झाले तर ताई उदास होत. आक्का म्हणजे याच व ताई म्हणजे त्याच असा आम्हा बेनाडीकरांच्या शब्दकोशातला कायम ठराविक अर्थ होता. गडकऱ्यांच्या सिंधूने या दोघींच्या रूपाने अवतार घेतला की काय हे कोडे मला अद्याप सुटलेले नाही.

वतनदार पाटील घराण्यात पहिला मुलगा झाला की वंशाचा दिवा लागला असे समजून बारसे होईपर्यंत गावात जल्लोष असतो. गावात दुसरा विषयच असत नाही. मग पुढे हाच दिवा भडकून त्यात घराचा स्वाहाकार झाला तरी बेहत्तर. सारा गाव वाजतगाजत वाड्यास तोरणे बांधतो. कुलकर्ण्यापासून करदचापर्यंत सर्वांचा मानपान करावा लागतो. गावाला ही एक पर्वणीच असते, म्हणून पहिली मुलगी झाली यामुळे आपल्या तालीवारपणाचा दिमाख दाखवावयाचा मोका हुकला म्हणून कदाचित वडिलांच्या कपाळाला त्यावेळी आठ्या पडल्या असतील. कदाचित कारण त्या पहायला मी त्यावेळी होतोच कुठे? पण कुलदैवताची ही कृपाच म्हणावयास हवी. कारण वडील बहिणीच्या देखरेखेखाली आम्ही वाढलो व वतनदार पाटलाच्या आजकाल सिनेमात दिसणाऱ्या संस्कारापासून दूर रहिलो. नाहीतर वडिलांचा करारी स्वभाव व तारुण्यसुलभ स्वैराचार यातून संघर्ष अटळच होता. घरातील एकात्मता टिकली ती आक्कांच्या पायगुणामुळेच.

तातूकाकाना (चुलते कै. दाजी अर्जून) लहान मुलांची फार आवड. सदा काहीतरी आणून ते लहान मुलांना जमवून त्यांना खाऊ घालीत. उन्हाळ्यात आंब्यावर व आंबरसावर आम्ही सारी मुले तिथेच ताव मारीत असू. नाताळच्या सणात मुलांना खेळणी व खाऊ वाटणाऱ्या पांढऱ्या शुभ्र दाढीवाल्या इसमाची जाहिरात पाहिली की मला तातूकाकांची आजही आठवण येते. ते खरेच ख्रिसमस काका होते. नेहमीच खिसमीस वाटीत असायचे. आण्णानी (वडील) यातले काही केले नाही. या दोघात साम्य एकच, ते म्हणजे उभयंताच्या डोईवर असणारा कोशा पटका. नाहीतर त्याच्यात दोन ध्रुवांचे अंतर - आण्णांच्या स्वभावाचे यथार्थ वर्णन करायचे तर हट्टीपणात व दुराग्रहात ते मुरारजी-भाईना भारी होते. हुकुमशाहीचे सर्व गुण (?) त्यांच्या अंगी

उपजतच होते. मोडेन पण वाकणार नाही हा त्यांचा बाणा. चर्चिलचे वर्णन " A wartime hero but a positive danger to peace. " असे केले जाते. मी त्यात आण्णांच्या नावाची एक भर घालीन. जगात कुठेही भांडण तयार झाले की इंग्लंड, अमेरिका एका बाजूस तर रशियाची साथ दुसऱ्यास. त्याचप्रमाणे गावात एकादे भांडण तयार झाले की आण्णा कुठल्या ना कुठल्या पक्षात असायचेच. वतनदार लिंगायत पाटील व वतनदार मराठा पाटील अशा दोन फळ्या एकमेकावर नेहमीच आरोप प्रत्यारोप करीत असायच्या व ठिणगी केव्हा पडेल याचा नेम नाही असे युद्ध-पूर्व तंग वातावरण असायचे. याच ईर्षेतून त्यानी लिंगायत पाटीलांच्या वतनी जमिनी काढून घेतल्या. गावचे नावच बेनाडी. आज वतनी नेतृत्व संपले असले तरी लोकशाही युद्ध कानडीमराठी वाद आजही आहेच.

घरात आण्णांचा दरारा मोठा. घरातच नव्हे तर गावातही ते घरात कधी नसतच. त्यांचे सारे आयुष्य कोर्टाच्या आवारात व वकिलांच्या घरातच गेले. घरी कधी त्यानी खाऊचा पुडा आण-ल्याचे मला स्मरत नाही पण वकिलांच्या मुलांना खाऊ नेण्यास ने कधी चुकले नाहीत. पण घरात असले की भीतीयुक्त शांतता असायची. मांजराला पाहून उंदीर जसे बिळात लपतात तसे आम्ही आपापल्या कोपऱ्यात गप्प. पण दरारा म्हणजे वादळापूर्वीची शांतता हे त्याना कधी कळलेच नाही व कळले असले तरी त्यानी ते मानलेच नाही. इतर समवयस्क भाऊबंदकीची त्याच्यापुढे कधी डाळ शिजली नाही तिथे आमच्या बिचाऱ्या आईची काय कथा ? पण आक्का त्याला एकमेव अपवाद. आक्कांच्या अंगी असा दैवी गुण होता की त्यांच्याशी बोलताना पथ्थरही पाझरत असे. आण्णा थोडेफार विरघळत ते आक्काना पाहूनच. मग जे काय आण्णाना सुचवायचे ते आक्कांच्या मार्फत असा घरात प्रघातच पडून गेला. सारे गाव आक्कांना " आक्का " या नावाने संबोधित असे व

"आक्कांची आई" या नावाने सारे गाव आईना हाक मारी. घरात आण्णांच्या नंतर स्थान होते आक्काना. आईना हे स्थान मिळविता आले नाही.

आण्णानी आपल्या आयुष्यात असे दोनच निर्णय चांगले घेतले की ज्यांच्याशी आम्ही भावंडे सहमत झालो. ते म्हणजे त्यानी आपल्या मुलींना निवडलेली 'स्थळे'. 'बारा गावी जमीन असलेला जमीनदार मुलगा हवा' या इतर भाऊबंदांच्या मतात व आण्णांच्या मतात जमीनअस्मानाचे अंतर होते. सुशिक्षित, सुसंस्कृत व मिळवता मुलगा हवा, मग जमीन नसली तरी बेहत्तर ही त्यांची अस्मानी धारणा. बारा गावी जमीन म्हणजे बारभाई कारभार, एक धड ना, भाराभर चिंध्या ही त्यांची भाषा. अशा जमीनदारांची तरणी पोरे आपली 'दौलत' दौलतजाद्यात उधळीत असलेले ते पाहातच होते. त्यानी या बाबतीत कोणाचेच ऐकले नाही व त्यांचे अंदाज अचूक ठरले ते याच एका बाबतीत. आक्कांच्यासाठी त्यानी निवडलेले स्थळ 'विश्वनाथ' पुढे राज-मान्य व लोकमान्यही पावले, तर विमलसाठी निवडलेले स्थळ भास्करराव जाधव यांचे चिरंजीव आप्पासाहेब, आपल्या पत्नीला 'बेगम' या लाडक्या नावाने हाक मारून हसत खेळत एखाद्या मित्रमैत्रिणीप्रमाणे इतर स्त्रियांना हेवा वाटावा इतक्या खेळी-मेळीने संसार करताना दिसतात. या दोन्ही निवडी आण्णांच्याच.

आक्कांचा विवाह मोठ्या थाटाने बेनाडी मुक्कामी झाला. शाहू महाराजानी आमच्या चुलत्याना (वडिलांचे लहान बंधू सदाशिवराव) क्षात्रजगद्‌गुरू पदावर नियुक्त केले. बेनाडीकरांना अभिमान वाटावा अशीच ही घटना. पण या बाबतीत आण्णांचा अहंकार अगदी उतास जात होता. काखेत कोशा पटका मारून गावातून फिरताना, जो दिसेल त्याला वेटीस धरून सुनावीत 'आमचा सदा! शाहू महाराज पाया पडतोय त्याच्या. दरबारात

महाराज आलं की साऱ्यांनी उठायचं. पण यानं नाही. तो गुरू ना त्यांचा! मग याच्या पायाला हात लावून महाराज सिंहासनावर बसले की दरबार सुरू. ऐकणाऱ्याच्या चेहऱ्यावर काय भाग्य हे असे आश्चर्य यावेळी आलेले असे. पण खरी मेख पुढेच असायची. "आणि हा सदाशिव मी असलो की खुर्चीवरही बसत नाही. मी त्याला म्हणतो की 'तू आता मोठा झालास' पण त्याला ते पटतच नाही. म्हणतो कसा की, पण आण्णा, तुम्ही माझे वडील बंधू तुमचा मान राखला पाहिजे." म्हणजे पर्यायाने आपण शाहू राजाहून थोर व प्रत्यक्ष क्षात्रजगद्गुरूहून आपणच अधिक भाग्यवान, अशीच ती बतावणी असायची. –शिवाय बेनाडीला आण्णांचा एक प्रतिस्पर्धी बाबू म्हादगोंडा याने आपल्या वडील मुलाचे लग्न मोठ्या थाटाने घातले होते. गावच्या चारी वेशीना कमानी होत्या साऱ्या गावात बरेच दिवस तो विषय घुमत होता. आण्णांच्या पार्टीच्या लोकांना हे कसे रुचावे? ते म्हणत ' आण्णा , बाबू म्हादगोंडाच्या या सवालाला तुम्ही मोठ्या ठसक्यानं उत्तर द्यायला हवं. ' आण्णा त्या संधीची वाटच पहात होते आणि यावरील पार्श्वभूमीवर आक्कांचे लग्न उभे राहिले. घराण्यातील पहिले लग्न म्हणून सारे भाऊबंद दिमतीस होतेच. मग म्हादगोंडाच्या लग्नात वेशीला कमानी तर बेनाडीला फाटा फुटतो तिथे सौंदलग्यावर पुणे-बंगलोर हायवे रस्त्यावर आमची कमान व स्वागत कमेटी. शाहू महाराजानी आपल्या गुरूंच्या दारात उभा केलेला हत्ती चांदीच्या हौद्यासह वरातीला. बेनाडी गावातील रस्तेच अरुंद म्हणून भिंती पाडून पुन्हा बांधून देण्यात आल्या. सर्व काही आजच्या लक्ष भोजनाप्रमाणे पहाणाऱ्यांनी तोंडात बोट घालावे इतक्या थाटानेच झाले पण, पाहुण्यांची सोय पाहुण्यांचे समाधान याहून आण्णांचे समाधान निराळेच, " काय म्हणतोस म्हादगोंडा ? "

" अहो, कुठं छत्रपतींचा ऐरावत, नी कुठं त्याच्या पोराच्या

वरातीतल टांग्याचं तट्टू ! वरात बघून कसं खेटरानं मारल्यासारखं तोंड झालं बघा तेचं" मग आण्णाना अधिकच स्फुरण चढे. मिशीवर ताव मारून ते म्हणत, "आर! दत्तू पाटील म्हणत्यात मला." आण्णांचा आनंद हा असा आगळा. जणूकाय त्यासाठीच केला हा सारा अट्टाहास.

आईच्या माहेरच्या नागराजाचे आक्कांच्यावर ते पहिले अपत्य म्हणून कृपाछत्र असावे. कारण नागपंचमीच्याच दिवशी जन्मलेल्या विश्वनाथाशी त्यांचा विवाह झाला. नागराजाची कृपा असली की सारी **वैभवे** पायांशी लोळण घेतात असा समाज आहे. व आक्का **व मामा** ( व्ही. टी. पाटील हे आम्हास या विवाहापूर्व नात्याने मामा लागत व आम्ही सर्व त्याना मामाच म्हणत असू.) यांच्या विवाहोत्तर भरभराटीकडे पाहिले म्हणजे याची प्रचीती येते.

मामांची वकिली "दिन दुनी रात चौगुनी" भरभराटीस येत होती. स्वतःच्या मोटारीने कोर्टात जाणारे ते कोल्हापूरातील पहिले वकील होते. छत्रपतींचा आशीर्वादही मिळाला व लोकप्रियतेच्या लाटेवरही ते आरूढ झाले. राजास प्रिय असलेला इसम जनतेला प्रिय असत नाही, व जनतेत प्रिय असलेला इसम राजास प्रिय होत नाही. पण मामांच्या बाबतीत हा अपवाद ते उभयतानाही सारखेच प्रिय होते. हा एक विलक्षण योगायोग व यातच त्यांचे असाधारण कर्तृत्व दिसून येते.

पण आर्थिक सुस्थितीत रमणारा त्यांचा पिंडच नव्हता. म्युनिसिपालिटी, लोकल बोर्ड, आमदारकी व नंतर खासदारकी अशा उड्या घेत त्यानी लोकप्रियतेचे एव्हरेस्ट गाठले. त्यावेळी आमचे घर ( तेव्हा आम्ही एकत्रित राहत होतो ) जोतीबाच्या जत्रेप्रमाणे गजबजलेले असायचे. अहोरात्र खलबते चालत. शुक्रवारातील वायंगणकरांच्या त्या घरास १० डाऊनिंग स्ट्रीटचे महत्व

प्राप्त झाले होते. पण या सर्वांना सांभाळून घेण्याचे अवघड काम आक्काना करावे लागे. मामा नेहमीच अवेळी येत. बरोबर ताफाही बराच असायचा. ते आतील जिन्यातून वर जात. जिन्यावरूनच ४० ताटे अशी ऑर्डर देत. आईंच्या कपाळाला आठ्या पडत. 'आता ? यावेळी ?' असे नाटकातल्या स्वगताप्रमाणे त्या पुटपुटीत. पण आक्काना याची सवयच होती. ताट, पाट व वाट्या यांचा सटच तयार असायचा. भाजीपाल्यापर्यंत सर्व काही निवडून-ही तयारच ठेवलेले असायचे व पाने मांडीपर्यंत त्यांचे जेवण तयार व्हायचे. मी वर जाऊन 'पानं मांडलीत' म्हणून पुकारी. 'काय इतक्यात? कोणीतरी अवाक् होऊन म्हणे. आक्काना या गोष्टींचा कधीच कंटाळा नव्हता. एखाद्या दिवशी मामा एकटेच परतले की त्यांचा हिरमोड होई. त्या साक्षात अन्नपूर्णा होत्या. द्रौपदीची थाळी सूर्यास्तानंतर काम करीत नसे. पण आक्कांच्या घरची थाळी रात्रंदिवस राबली. ती थांबली ती आक्का अंथरुणाला खिळल्यावरच.

त्याना उपमाच द्यायची झाली तर समईची देता येईल. कारण त्यात गॅसबत्तीचा झगमगाट नव्हता. राईचा पर्वत करून त्याचे श्रेय स्वत:कडे कसे घेता येईल अशा या चढाओढीच्या व जाहिरातबाजीच्या युगात हा गुण दुर्मिळ. शाळेतील समारंभ नेहमीच भव्य, दिव्य व यशस्वी होत आले. अर्थात त्याचे श्रेय शाळेसाठी आयुष्यभर राबलेल्या मामाना व त्याना नेहमी प्रेरणा देणाऱ्या आक्कांच्या पुण्याईला. पण नाही! त्याचेही श्रेय स्वत:कडे घेऊन त्याची जाहिरात सातत्याने करणारे महाभागही मी पाहिले आहेत. हे 'मीपण' त्यांच्यात नव्हते. 'माझीया मीपणावर पडो हा पाषाण' असा मीपणावर. संत तुकोबानी उतारा सुचविला आहे पण इथे 'पडो' ही इच्छा पुरी होईपर्यंतही उसंत नाही. स्वत:च्या हातांनीच तो टाकून घेतलेला.

त्या फारशा शिकलेल्या नव्हत्या. शिक्षणाचा व सुसंस्कृतपणाचा ओढून ताणून संबंध जोडण्याचा प्रयत्न आजकाल साक्षरता प्रचारातून केला जातो. पण शिक्षणाच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळी झालेली माणसेच अहंकाराच्या काविळीने पछाडलेली दिसतात. त्या पदवीधर नव्हत्या. पण सुसंस्कृतपणाची परमोच्च पदवी निसर्गानेच त्याना बहाल केली होती. त्या मुळातच मितभाषी. जहरी भाषा तर राहोच पण एकादा दुसरा वेडावाकडा शब्दही त्यानी आपल्या आयुष्यात उच्चारला नाही. क्षुल्लक कारणावरून झालेल्या कौटुंबिक मतभेदात स्वतःला शहाण्या कुळीचे खानदानी म्हणवणाऱ्यांनी स्वतःच्या कुटुंबातच एकमेकास उद्देशून उच्चारलेले असे काही शब्द मी ऐकले आहेत की ते ऐकून साऱ्या तमासगिरांनी लाजून खाली मान घालावी. काही वडिलधारी मंडळी आपल्या बोलण्यात नेहमीच " . . . . च्या " चे अनेक प्रकार तोंडी लावूनच भाषणास सुरुवात तरी करतात किंवा त्यावर त्याचा शेवट तरी होतो. व त्याचे त्याना काही वाटतही नाही. 'सवंयच आहे हो, ही आमची म्हणून त्याचे समर्थनही करतात. चुकून एखादा अभद्र शब्द तोंडातून बाहेर गेल्यावर त्याबद्दलची दिलगिरी प्रदर्शित केल्यास ते समजण्यासारखे आहे. उलट त्याचे समर्थन करताना पाहून वाटते की ही जातच निराळी. सुसंस्कृतपणाची अपेक्षाही इथे व्यर्थ आहे. या विरोधात आक्कांचा सुसंस्कृतपणा विशेषच उठून दिसतो. निरनिराळ्या खात्यातील अनेक नोकर मामांच्या इथे नोकरीस असायचे. एका खात्यातून दुसऱ्या खात्यात वर्ग झाल्यास त्यांना ही नोकरी सोडून दुसरीकडे जाणे भाग पडे. अशा वेळी त्यांना गहींवरुन येई. ते ओक्साबोक्शी रडत अशी मालकीण पुन्हा मिळणार नाही हे त्यांचे खरे दुःख. नोकरांचाकरांनाही त्यानी घरच्या प्रमाणेच वागविले. कधी वेडावाकडा शब्दही उच्चारला नाही. त्यांना भरपूर शिल्लक आहे याची खात्री झाल्याशिवाय त्या जेवल्या नाहीत. " माऊलीच्या

मायेन यानी आम्हास सांभाळलं. साहेब मला बदली नको. मला इथंच राहू द्या" ही भाषा मी ऐकली आहे. अशा वेळी आक्काच त्यांचं सांत्वन करीत. पायावर डोके ठेवून ते निरोप घेत व सणासुदीला नेहमीच हजर असत न बोलाविता.

आमच्या घरात मी सर्वात अधिक व्रात्य. आण्णांशी नेहमीच समरप्रसंग. माझ्या कधी न्याय्य तर कधी अन्याय अशा कामगाराप्रमाणे कांही मागण्या असत. कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलांना काही पॉकेटमनी दिला पाहिजे ही कल्पनाच आण्णांना मान्य नव्हती. मग मी त्याना रस्त्यात घेराव घाली. मुलांच्या मागण्यापुढे मान तुकविणे म्हणजे घरातल्या आपल्या स्वामित्वास धक्का अशी सरकारप्रमाणे आण्णाही आपली समजूत करून घेऊन प्रश्न प्रतिष्ठेचा बनवीत. निष्पन्न काहीच होत नसे. प्रकरण चिघळले की आक्काच मध्यस्थाची भूमिका घेत.मी चुकलो असलो तर समजूत काढण्याचा प्रयत्न करीत. अगदी हटूनच बसलो तर "आजपासून तू माझ्याशी बोलू नकोस." येवढेच म्हणत. मग का कोण जाणे त्यांचे ते शब्द धारेच्या पात्याप्रमाणे काळीज चिरीत जात व आण्णांच्या मारात टिपूसही न काढणारे माझे डोळे आसवांनी डबडबून वाहू लागत. "आक्का, बोलाना माझ्याशी!"मी स्फुंदतच म्हणे. "कंबूऽ – पाणी हाऽय याच्या डोळ्यांत ?" आईचा शेरा ऐकू येई आणि मग आक्काना राहवत नसे. त्या हसून बोलत. मग 'जितं मया' या आनंदात आण्णांच्याकडे पाहून 'थोरला झाल्यावर पाहून घेईन.' अशी गर्भित धमकी घेऊन मी घरातून बाहेर पडे. अशावेळी वाटे की, आक्कानी एकवेळ तरी माझ्यावर रागवावे. पण पुरी न झालेली ती एक वेडी आशा.

दुसऱ्यासाठी काहीतरी सतत करीत राहिल्याशिवाय स्वतःच्या जीवनास पूर्तता नाही ही त्यांची वृत्ती. सुख वाटणे हा त्यांचा स्थायी भाव. मोठ्या आत्मियतेने दुसऱ्याच्या अडी–अडचणी दूर करण्यात त्यानी आपली बरीच संपत्ती खर्च केली.

असला जमाखर्च जगास दाखविता येत नाही. त्यातून अव्यवहारीपणाच दिसून येतो. त्यानी तो कुणाला सांगितलाही नाही. त्याचे समाधान त्यानाच. त्या समाधानाची किंमत रुपये आणे पैनी मोजता येत नाही. त्याचे मापच निराळे. व्यवहारी जगाला ते कधी कळणारही नाही.

मामानी पहिला खटला जिंकला व अशिलाकडून मिळालेली प्रथम कमाईची फी त्यानी आक्कांच्या हवाली केली. दुसऱ्या एखाद्या स्त्रीने त्याचे खचितच अलंकार केले असते व चार चौघात मिरवून घेतले असते. पण, मामानी वकीली सुरू केल्यावर आपली B.S.A.सायकल दादाना दिली.माझी सायकलची रास्त मागणी आण्णानी झटकून टाकली. मी त्यामुळे हिरमुसला झालो होतो. आक्कानी त्याच रकमेतून मला सायकल घेऊन देण्यास सुचविले. दुसरे दिवशी संध्याकाळी बावीस इंची रॉयल इनल्फिड वरून मामाना परतताना पाहून मला जो आनंद झाला होता त्याचे यथार्थ वर्णन करण्यास शब्द भांडार अपुरे आहे. एवढेच नमूद करावेसे वाटते की मित्र जोडता येतात पण बहीण असावीच लागते. अशी बहीण मला लाभली हे माझे भाग्य.

दादा विनायकरावांच्या सहवासात वाढले. विनायकराव भावनोत्कट व पुरोगामी विचारांचे. त्यांचे संस्कार दादांच्यावर झाले नसते तरच नवल. ' प्रेमाच्या अधिष्टानाशिवाय वैवाहिक जीवन व्यर्थ होय, ही त्यांची धारणा. प्रेमासाठी सिंहासनावर लाथ मारणारा ड्यूक ऑफ विंडसर हा त्यांचा आदर्श. दादानी प्रेम विवाह केला. आज्ञाधारक मुलगा बंडखोर ठरला. लग्नाला जाताना त्यानी आण्णांच्या पायांना हात लावून नमस्कार केला. पण सारी पूजा यथासांग करूनही प्रसाद घ्यावयाचा प्रमाद घडताच कोपिष्ट होणाऱ्या सत्यदेवाप्रमाणे त्यानी " तुझा नष्टांश होईल " ही शाप वाणी गर्जून दादाना आपल्या पायांनी दूर ढक–

लले. हा सारा तमाशा पाहात बसण्याखेरीज मलाच काय पण कुणालाही त्यावेळी काहीच करता आले नाही. यावेळी आण्णाना भेटूच नका हा माझा व्यवहारी सल्ला दादानी मानला नाही याचे दु.ख मात्र झाले. पण चित्रपट सृष्टीतील धीरोदत्त नायकाप्रमाणे ते उठले व शांतपणे म्हणाले, "आपला असाही पद स्पर्श माझे भावी जीवन यशस्वी करील." असे म्हणत त्यानी आपल्या भावी जीवनाच्या उपजीविकेच्या साधनांची तिथेच प्रचीती दिली.

विवाहासाठी ते नृसिंहवाडीस निघून गेले. पाठोपाठ मी व माझे चुलत बंधू आनंदराव टुरिंग काढून वाडीस पोचलो. वधू-तर्फे वडीलधारे माणूस म्हणून कै. ए. वी. पार्टे यानी कन्यादान केले. आनंदरावानी कमरेला सुपारी लावून (त्यावेळी ते अविवाहित होते) वरातर्फेचे धर्मसंस्कार केले. अक्षता पडल्या. स्वयंवर झाले. आमचा जय झाला. असे त्यावेळी आम्हा यंगस्टर्स ना वाटले खरे, पण परतायचे कोठे? हा यक्ष प्रश्न पुढे ठाकला. यक्षणिची कांडी फिरावी तशी आक्कांची त्यावेळी आठवण झाली. आणांच्या निषेध खलित्यांना वाटाणाच्या अक्षता लावून आक्कानी दादाना, सोंगटीच्या पटातील कट्टीच्या घराप्रमाणे आसरा दिला. पाटलाची मानाची सून म्हणून त्यानी वहिनींचे कौतुक केले. दादांची जेष्ठ कन्या आशा हिचा जन्म सरोज बंगल्यातच झाला. आक्कानी तिचे बारशे पोटच्या मुलीप्रमाणे घातले. आक्कानी नेहमीच न्याय्य बाजू उचलून धरली. कसल्याही दडपणाखाली त्यांनी अन्याय्य बाजूस आपली सहानुभूतीही दाखविली नाही.

घरटचातून चोची मारुन हुसकून लावलेला बहिरी ससाण्याचा बच्चा स्वावलंबी होऊन आकाशात भरारी घेतो. पिंजऱ्यात खाऊपिऊ घातलेल्या पक्ष्याच्या पंखातील झेप घेण्याची शक्तीच लुप्त झालेली असते. दादा सिनेसृष्टीत लेखक-दिग्दर्शक

म्हणून यशवंत झाले. त्यांचे स्वावलंबी जीवन पाहून आक्कांचा अभिमानाने उर भरून आला. माझे जीवन माझ्या दत्तका–मुळे आर्थिक दृष्टचा थोडेफार सुसह्य झाले होते. प्रश्न उरला विश्वासाचा. आमच्या जनक घराण्यातील एका विधवा बाईस हाताशी धरून आण्णांच्या हितशत्रूंनी दत्तक घातला. ‘ सुईच्या अग्रावर मावेल येवढी जमीनही मी दत्तकास देणार नाही. ” या अण्णांच्या दुर्योधनी हटवादातून महाभारत घडले. व्हिएटनाम युद्धाप्रमाणे अण्णानी सत्ता-वीस वर्षे झुंज दिली व शेवटी सर्वनाश ओढवून घेतला. घरातील लक्ष्मी याला कंटाळून घरातून निघून गेली. तिने परतून तोंडही दाखविले नाही. या साऱ्या प्रकारची सर्वात अधिक झळ आम्हा भावंडापैकी विश्वासलाच अधिक पोचली. दादा जटायूच्या पंखाने भरारी घेत होते. मी पिंजऱ्यातले पेरू खात होतो. विश्वासची हालत ‘ना घरका, ना घाटका ’ अशी झाली. तुटपुंज्या पगारावर तो आपली गुजराण कशी तरी करीत होता. आक्कांच्या समाज-वादी मनास याची बोचणी सुरू झाली. अशा वेळी आक्कानी आपल्या सहानुभूतीचे झुकते माप विश्वासच्या पदरात टाकल्यास त्यात गैर तर काहीच नव्हते उलट ते रास्तच होते. यानंतरच्या भाऊबंदकीच्या खेळात विश्वासबद्दल माझ्या मनात आज वाटत असलेली भावना निर्माण करण्याचे सारे श्रेय आक्कानाच द्याव–यास हवे. तसा विश्वास हा अगदी सरळ, साधा व सीधा म्हणून सर्वांनाच आवडता. पण नंतरच्या त्याच्या आजारीपणात त्याच्या-साठी पदरमोड करायची पाळी येताच ‘ ताक तुंबा दे, त्या घरला जा ’ चा खेळ सुरू झाला. व्यवहारात ऋणानुबंध, नातीगोती, समाजकर्तव्य आदि शब्द अर्थहीन आहेत याचे विराट दर्शनही याच वेळी घडले. आक्कानी मात्र विश्वासला शेवटपर्यंत साथ दिली. ‘ योगक्षेमं वहाम्यहम् ’ या जाणिवेतून परिस्थितीच्या

झंझावातात हेलकावणाऱ्या त्याच्या जीवन - ज्योतीस आपल्या हातांच्या पंजांचा आधार देऊन त्याचे संरक्षण केले.

अपत्य न झाल्याची खंत आक्काना कधी वाटल्याचे मी पाहिले नाही. 'ठेविले अनंते तैसेची रहावे' ही त्यांची संतवृत्ती. सारी जायदाद आक्कांच्याच नावावर असल्याने त्याची विल्हेवाट आक्कानी आपल्या मर्जीप्रमाणे लावावी ही मामांची इच्छा. दत्तकाची कल्पनाही त्यानी आक्कांच्यापुढे मांडली. त्या म्हणत, "साहेब, तुम्ही आपले जीवन शैक्षणिक कार्यास अर्पण केले. श्री. मौनी विद्यापीठ व ताराराणी विद्यापीठ ही तुमची चिरंतन स्मारके. तुमच्या पश्चात त्यांचे काय ? ती जर तुमच्या पश्चात पोरकी होणार असतील तर या माझ्या जिंदगीचा उपयोग काय ? दत्तकाने चैन करावी व माझ्या शाळेने पोरके व्हावे ही कल्पनाच मला सहन होत नाही. साहेब, माझा निर्णय मी फार पूर्वीच घेतला आहे. माझी सारी मिळकत ताराराणी विद्यापीठास दिल्यास तिचे सोने होईल. माझा हा निर्णय मी पूर्ण विचारांती घेतला असून तो कायम आहे. त्यात आता बदल होणार नाही. तुम्ही सांगूनही . . ."

मुलाच्या हातच्या धर्मसंस्काराशिवाय मोक्ष नाही ही हिंदुधर्मशास्त्राची सनातन धारणा. याचाच आधार घेऊन संधिसाधू लोकानी दत्तकाची कल्पना राबवली. पण कै. राजर्षी शाहू छत्रपतीप्रमाणे आक्कानी आपल्या धार्मिक कल्पनात क्रांतिकारक बदल केले व आपली सारी स्थावरजंगम मिळकत ताराराणी विद्यापीठ या कल्याणकारी स्त्रीशिक्षणसंस्थेस अर्पण केली. माझी खात्री आहे की मोक्षमंदिराच्या प्रवेशद्वारात पायघड्या घालून देवेंद्र आपल्या साऱ्या मांडलिकांसह त्यांच्या स्वागतासाठी तिष्ठत उभा राहिला असेल व गंधर्वांनी केलेल्या पुष्पवृष्टीतून त्याना त्यांच्या खास आसनावर बसविताना लोकोत्तर दिवंगतानीही मानवंदना दिली असेल.

दत्तकास मान्यता मिळाली नाही म्हणून बंडात सामील होणाऱ्या स्त्रियांचा इतिहास, आम्ही मोठ्या चवीने वाचतो. त्यांच्या धडाडीचे पोवाडे गातो. त्यांचे पुतळे उभारतो. पण या भौतिक मोहावर मात करून समाज कल्याणास अग्रहक्क देणाऱ्या या असामान्य स्त्रीस आपण विसरणार आहोत काय ? विसरल्यास त्याचे त्यांना काही वाटणारही नाही. त्याची खंत वाटावयास हवी आम्हासच. 'गरिबी हटाव' घोषणेने ती हट–णार नाही. बोलाचीच कढी व बोलाचाच भात वाढून व त्यावर मृगजलाचे पाणी पिऊन ढेकर देण्याचा उपदेश आमचे राज्यकर्ते करीत आहेत. पण याने कोण संतोषिला! या उपेक्षित बुभुक्षि–तांच्या अपेक्षित पोटतिडिकीतून उद्याचा ब्रह्मसमंध आपणापुढे आ वासून उभा ठाकणार असून माणसाचे रक्त पिऊन तट्ट फुगणाऱ्या ढेकणाप्रमाणे तो या राज्यकर्त्यांसह तट्ट फुगलेल्या साऱ्यांनाच चिरडल्याशिवाय राहणार नाही. नक्षलवाद याचीच सुरुवात होय.

दुसऱ्यासाठी स्वत: काहीतरी केले पाहिजे ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजविल्याशिवाय, केवळ घोषणा निरर्थक होत. यासाठी असे समर्पित जीवन पाठ्यपुस्तकातून विद्यार्थीदशेतच बिंबविले पाहिजे. कल्याणकारी राज्य प्रस्थापित होण्यास याची मदत झाल्याशिवाय राहणार नाही. स्वत:च्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक सुस्थितीतील व सधन माणसाने शक्य ते देण्यास तयार राहिले पाहिजे. ही काळाची आजची निकड असून ती जो न जाणेल तो एक महामूर्ख जाणावा.

भक्ती हा आक्कांचा गुण त्यांच्यात वसत असलेल्या गुणात अव्वल होता. त्यांचे जीवन भक्तिरसाने ओथंबलेले होते. देवघरात जगत्नियंत्यासमोर हात जोडून त्याची करुणा भाकण्यात त्यांचा बराच वेळ जाई. समृद्धीच्या शिखरावर असताना त्याना त्याची वास्तविक गरजच काय ? सर्वस्वाचे एकदा दान दिल्यावर स्वत:-

साठी त्यांची एकादी इच्छा अतृप्त राहिली असेल हेही संभवत नाही. " दुरितांचे तिमिर जावो " हीच त्यांची सद्भावना.

दत्ताच्या त्या उपासक होत्या. त्रिमूर्ती दत्त हे त्यांचे दैवत नृसिंहवाडी हे त्यांचे माहेर. परमेश्वरावर त्यांची नितांत श्रद्धा. कोणत्याही व कसल्याहीं कठीण प्रसंगी ही श्रद्धा कधीच ढळली नाही. असाच एक प्रसंग –

विश्वासला कर्करोग झाल्याचे निदान डॉ. परांडेकर यानी मला सांगितले. कर्करोगाची ख्याती मी ऐकून होतो. माझी कंबरच खचली. विश्वास सरळ सदाचारी नी इतका निर्व्यसनी की त्याने सिगारेट तर राहोच पण सुपारीचे खांडही तोंडात धरले नाही. अशा या सरळ माणसास जर हा असाध्य रोग होतो तर या जगात देव तरी आहे का? अशी रास्त शंका माझ्या मनास चाटून गेली. सज्जनानाच पिडणारा हा देव कसला ? त्याच्या अस्तित्वावरचा विश्वासच उडावा असाच हा विश्वासवरचा प्रसंग. मी तसे बोलताच आक्का म्हणाल्या, " जयसिंग, असं बोलू नकोस, तो आहे, कदाचित तो आमचीच सत्वपरीक्षा पाहात असेल " अशा वेळीही हा दृढविश्वास . विश्वासवर वेळीच उपचार होण्यासाठी आम्ही पराकाष्ठा केली. त्यावेळचे गृहमंत्री ना. बाळासाहेब देसाई व त्यांची कर्ती मुले जयसिंगराव व अशोकराव हेही मदतीला धावले. त्यांच्या प्रयत्नामुळे डॉ. पे मास्टर यानी केस हाती घेतली. नऊ महिन्याहून अधिक काळ केस टिकणार नाही असे डॉक्टरी विधान मजजवळ केले. ' ऑपरेशनचा उपयोग होणार नाही ' या त्यांच्या शब्दांनी मी घायाळ झालो- हा निरोप अश्रु–पूर्ण नेत्रानी मी देसाईसाहेबाना कळविला. ते डॉ. पे मास्टरना पुन्हा भेटले व म्हणाले, ' डॉक्टर, मला वैद्यक शास्त्रातील जाण नाही. पण तुम्ही शक्य ते सर्व प्रयत्न करावेत एवढी विनंतीच काय ती मी करू शकतो." त्यांच्या शब्दास मान देऊन डॉ. पे मास्टरनी

ऑपरेशनची तयारी केली. इकडे विश्वाससाठी तीळ तीळ तुटणाऱ्या आक्काना काय झाले असेल याची मला कल्पनाच करवेना. देवघरातून त्या बाहेरच आल्या नाहीत. सतत अश्रूंच्या फुलांचा अभिषेक चालू ठेवून त्यानी भगवंताला साकडे घातले. ऑपरेशन झाले व नंतर विश्वास दोन अडीच वर्षे अधिक आमच्यात राहिला. नंतरच्या एका भेटीत मी डॉ. पे मास्टरना म्हटले, ' डॉक्टर, नऊ महिने यांचे आयुष्य असे विधान पूर्वी तुम्ही केले होते त्यास आज दोन वर्षे होऊन गेली. "

" हा एक चमत्कार आहे. " एवढेच त्यानी उत्तर दिले. माझी श्रद्धा आहे की आक्कानी त्याला आपुले आयुष्य दिले. एकीकडे कुठेतरी फाजील जमा झालेली रक्कम दुसरीकडे कुठेतरी खर्ची घातल्याशिवाय ताळेबंद जमत नाही. हा आकडेशास्त्राचा सिद्धांत आहे. आक्कांच्या खाली त्यांचे आयुष्य खर्ची घातल्याशिवाय विश्वासच्या खाती जमा झालेल्या आयुष्याचा मेळ या मानवी आयुष्याच्या ताळेबंदात ब्रह्मदेवालाही जमविता आला नसेल. डॉ. पे मास्टर यालाच चमत्कार म्हणतात. मला खात्री वाटते की विश्वासला कॅन्सर झालाच नसता तर आक्का आमच्यात दोन–अडीच वर्षे अधिक खचितच राहिल्या असत्या.

बाबराने आपले आयुष्य हुमायुनाला मिळावे म्हणून अल्लाची करुणा भाकली. बखर लिहिणाऱ्या त्याच्या पगारदार नोकराने त्याची नोंद केली. स्वतःच्या आयुष्याचे दान कर–णारा असामान्य पुरुष म्हणून जगाने त्याला गौरविले. प्रसिद्धीची दालने राबवणारी माणसे हाताशी असली की हे जमून जाते. आक्कांच्या या महान त्यागाची नोंद इतिहासात होणार नाही. प्रसिद्धीपरांगमुख आक्कांच्या आत्म्यास अशी नोंद रूचणारही नाही. प्रसिद्धीने दातृत्वास हीनत्व येते ही यांची धारणा व म्हणूनच हा त्याग अधिक सरस आहे. अधिक मोलाचा आहे. हाडा–

मासाची अशी स्त्री या अवनीवर होऊन गेली यावर पुढील पिढी विश्वासही ठेवणार नाही. असे हे अलौकिक जीवन.

अशा या त्यांच्या गंगाजलाप्रमाणे निर्मल व पवित्र देहात संधिवाताचा प्रादुर्भाव होण्यास कशी संधी मिळाली कुणास ठाऊक? जीवनभर त्यांनी दोन्ही हातांनी दिले, स्विकारली ती व्याधीच. घटप्रभा येथील आरोग्यधामात त्यांच्यासाठी एका स्वतंत्र कुटीची व्यवस्था मामानी केली होती. त्यांच्या या स्वतंत्र कुटीसमोर असलेल्या देवळात मारुतीच्या मूर्तीची नुकतीच प्रति–ष्ठापना झाली होती. कॉटवर पडून त्या मंदिराकडे पाहात रिकामा वेळ घालवीत. थोडे बरे वाटले की त्याची प्रदक्षिणा सुरू होई. दहा प्रदक्षिणांचे बल, बलभीमाकडून मिळाले की त्या परत येत. प्रकृतीच्या प्रगतीचा तो त्यांचा ठोकताळा होता. इक–डील वातावरणात पुन्हा थोडे जास्त झाले की पुन्हा त्या कोरड्या हवेत जात. पुन्हा परत येत पुन्हा जात. हे असे चाले व असेच चालेल असे वाटायचे. संधिवात हा रोग असाध्य ठरून त्या तडका-फडकी आमच्यातून निघून जातील अशी पुसटही कल्पना कुणाला त्यावेळी आली नाही.

पण विपरीत घडले. एक दिवस त्यांना अचानक जास्त झाले. गडबडीने जाऊन मी त्यांच्या उशाशी बसलो. ‘ कुण्या अध-माची दृष्ट तर लागली नसेल ना?’ अशी शंकाही आली. भिंतीवरील पाल चुकचुकली. माझा शकून अपशकूनावर विश्वास नाही. परमे–श्वरावरील विश्वासही विश्वासच्या मृत्युबरोबरच पार उडाला होता. मात्र अकारण आलेली ही शंका निष्कारण मनात घर करून बसली. कोण कोण येऊन गेले याचा बारीक तपास घेण्याचा प्रयत्न केला. पण काहीच दुम लागला नाही. चला काही तरीच हे. मन चिंती ते वैरी न चिंती म्हणतात त्यातला हा प्रकार असे समाधान मानून घेतले.

त्याना तातडीने घटप्रभेस हलविण्यात आले. प्रकृती सुधारत आहे अशी तार दररोज येई. सर्वांना समाधान वाटे. काम करण्यास हुरुप येई. एक दिवस मी सकाळी घटप्रभेस गेलो. गुरुवार होता. यावेळी त्याना मिळालेली कुटी निराळी होती. तेथून शक्तीच्या उपासकाचे मंदिर दिसतही नव्हते. पुन्हा अकारण भीती वाटली. पण आक्काना दवाखान्यातच ठेविले होते. बरोबर दिमती ला गेलेली मंडळीच तेवढी त्या कुटीत रहात हे पाहून समाधान वाटले.आक्कांची प्रकृती सुधारत होती. काळजी करण्यासारखे काही वाटले नाही. परतावे म्हणून पाच वाजता स्टॅन्डवर आलो पण गाडी चुकली म्हणून परतलो. रात्रीची जेवणाची वेळ झाली. आळीपाळीने जाऊन काहीतरी खाऊन यावे असे ठरले. मामाना मी म्हणालो, "तुम्हीच जेवून या प्रथम. आम्ही जेवतो नंतर" मामा उठले. त्यानी आक्काना विचारले. त्या काहीच बोलल्या नाहीत. बोलण्याचा त्रास होत असेल तर बोलूच नये त्यानी असेच वाटले. पण मामा पुन्हा स्टुलावर उशाशी बसले. त्यांच्याकडे पाहात आक्कानीच बोलण्यास सुरवात केली, "साहेब, मी आता जाते. (दत्त) महाराज बोलावीत आहेत." अर्थ सरळ होता.

संकटाच्या राशी कोसळल्या तरी मेरुमणीप्रमाणे निश्चल राहणाऱ्या मामांच्या नेत्रातून अश्रुधारा सुरू झाल्या. कुठचे जेवण नी कुठचे काय ? साऱ्यांच्या पायाखालची वाळूच सरकत होती. प्रकृतीने अचानक उचल खाल्ली. डॉक्टर, नर्सीस यांच्या येरझाऱ्या सुरू झाल्या. कोल्हापूर– गारगोटीकडे ट्रंककॉल्स गेले. प्राणवायूचे सिलेंडर आणलेले दिसताच माझे प्राण कंठाशी आले. 'एवढी वेळ टळली की बरे वाटेल.' डॉक्टर धीर देत.

रात्र वैऱ्याची. भेसूर शांतता. कुठेतरी होणाऱ्या रात किडयांच्या 'किर्रर्र' आवाजाने काळीज लखलखे. एक एक क्षण

युगासारखा वाटू लागला. विषण्ण मनाने मी बाहेर येऊन झाडाखाली कट्टयावर बसलो. कोल्हापूरहून मोटारी येऊ लागल्या. मोटरीतून उतरलेल्या मंडळींना माझा उतरेला चेहरा न बोलताच सर्व काही सांगे. मंडळी आत गेली. न राहवून मीही पुन्हा आत गेलो नी सारा अवकाश आक्रोशाने भरून व्यापला. आकाशीची कुऱ्हाड कोसळली. दैवाने आम्हा साऱ्यावरच अमानुष सूड उगवला. ताराराणी विद्यापीठाचा मनोरा भंगला. आम्ही पोरके झालो. विश्वनाथ अनाथ झाले.

१८ जुलै १९६९ इ. रोजी पहाटे २ वाजता आक्का दत्तस्वरूप झाल्या.

त्यांचा पार्थिव देह पंचमहाभूतात विलीन झाला. एक शांतिपर्व संपले. आता राहिला आहे तो त्यांच्या स्मृतींचा सुगंध– भावसुगंध !

* *

# आमच्या काकी

– प्राचार्य एम्. जी. माळी

पुण्यश्लोक सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथराव पाटील यांना ताराराणी विद्यापीठ व श्री मौनी विद्यापीठातील आम्ही सर्व जण काकी या आवडत्या व घरगुती नावाने ओळखतो. काकी म्हणजे खानदानीपणा, औदार्य, कनवाळूपणा आणि त्याग यांचे मूर्तिमंत प्रतीक. आपले पती मा. व्ही. टी. पाटील उर्फ काकाजी यांचे काकी हे स्फूर्तिस्थान.

श्री मौनी विद्यापीठ आणि ताराराणी विद्यापीठ या थोर व वैशिष्ठ्यपूर्ण संस्था वाढविण्यामध्ये मा. काकाजींना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. काही रात्री जागून काढाव्या लागल्या. संकटांनी झोप उडत असे. या सर्व प्रसंगी एखाद्या कुशल मानसशास्त्रज्ञाप्रमाणे काकीनी काकाजीना सांभाळ–ण्याचा, धीर देण्याचा आणि स्फूर्ती देण्याचा सतत प्रयत्न केला. पती हा परमेश्वर या भूमिकेतून त्यानी काहीही करण्याचे शिल्लक ठेवले नाही. काकांचे ज्यात समाधान त्यात काकींचे समाधान. या दृष्टीने मा. काकाजी अत्यंत भाग्यवान मानावे लागतील.

पूज्य सौ. काकी यांचे घर म्हणजे साक्षात लक्ष्मीचे मंदिर. गोरगरीब, नोकरचाकर यांनी काकीना आपल्या अडचणी सांगाव्यात, दुःखे व्यक्त करावीत आणि या कनवाळू माऊलीने त्यांना

सढळ हाताने मदत करावी, हा क्रम किती तरी वर्षे चालला असल्याचे अनेकांकडून मी आजही ऐकत आहे. गरजू किंवा अडचणीत असलेला माणूस अडचणीत राहू नये यासाठी त्या सढळ हाताने मदत करीत. घरी कोणीही पाहुणा येवो किंवा नोकर-चाकर असो तो तृप्त होऊनच जात असे.

खानदानी घराण्याला साजेल असेच काकींचे व्यक्तिमत्व व आचारविचार होते. ताराराणी विद्यापीठातील मुली या आपल्या मुली, ताराराणी विद्यापीठाचा संसार हा आपला संसार, गरीब विद्यार्थिनींच्या अडचणी या आपल्या घरच्या अडचणी, त्यांना मदत म्हणजे आपल्याच मुलींना मदत, या भूमिकेतून काकींना जे जे करता येईल ते ते त्यानी केले.

स्वत:ला मूळबाळ नाही. सांपत्तिक स्थिती चांगली. अशा परिस्थितीत सामान्य स्त्रीने आपला वारसा राहावा यासाठी दत्तक घेण्याचा प्रयत्न केला असता. परंतु या थोर माऊलीने ताराराणी विद्यापीठालाच दत्तक घेऊन टाकले. सर्व संपत्तीचा ट्रस्ट करून ताराराणी विद्यापीठाच्या ती कारणी लावली. एक असामान्य त्यागाचेच हे उदाहरण मानावे लागेल.

मला नेहमी वाटते की, मा. काकाजींच्या हातून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात जी महत्वपूर्ण कामगिरी पार पडली त्यामध्ये पूज्य काकींचा सिंहाचा वाटा आहे. काकाना यश मिळावे यासाठी त्यानी अहोरात्र प्रयत्न केले. त्यांचे परमदैवत म्हणजे श्री दत्त. त्यांची निस्सीम देवभक्ती म्हणजे साक्षात शक्तीच होती. ही शक्ती आणि भक्ती मा. काकांना अद्यापही साथ देत आहे. पूज्य काकी काकाजीना सोडून गेल्या त्यावेळी काकांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. ते निराधार झाले. वेडेपिसे झाले. त्यांच्या डोळयातून सारखे अश्रू वाहू लागले. कित्येक दिवस असेच चालले होते. त्यांचा एकमेव आधार नाहीसा झाला होता.

हळूहळू धीराने त्यानी आपले अनावर झालेले दुःख आवरते घेण्याचा प्रयत्न केला.

मा. काकाजी गेल्या वर्षी अचानक आजारी पडले. फार भयानक आजारातून किंबहुना मृत्यूच्या जबड्यातून ते बचावले. तज्ज्ञ डॉक्टरांनीसुद्धा काकाजी जाणार नाहीत असाच अंदाज बांधला होता. पण दोन्ही संस्थांच्या बाबतीत, त्यांच्या योजना, त्यांची स्वप्ने आणि त्यांचे संकल्प अद्याप सिद्धीस जाण्याचे असल्याने त्याना आणखी जगण्याची आवश्यकता होती आणि झालेही तसेच. ते आजारातून पूर्ण बरे झाले. परमेश्वराने त्यांना पुनर्जन्म दिला. मला वाटते हा पुनर्जन्म म्हणजे काकींच्या निस्सीम देवभक्तीचे किंवा दत्तभक्तीचे फळ होय. काकी आज प्रत्यक्ष जरी नसल्या तरी त्या अप्रत्यक्ष काकांच्या जवळ नेहमीच आहेत आणि त्याना त्या पूर्वीप्रमाणेच नेहमी सांभाळतील, धीर व स्फूर्ती देत राहतील.

* *

# प्रिय सौ. काकी याना–

– सौ. ममता तावडे

प्रिय सौ. काकी याना,

सविनय प्रणाम.

भावना उफाळताहेत म्हणूनच हे भावलिखित ! अथांग ओथंबलेल्या पावसालाच धरित्री हुंकार देते. तिला अंकुर फुटतात. माझी ही खुळी माया तुम्हाला शोधीत आहे. तशीच त्या वेडया पावसासारखी. द्याल ना तिला साद ?

सत्तावीस पावसाळे उलटले. तेव्हा ही जमीन ओसाड होती. आसुसलेली ..... माणूस शोधीत होती आणि तिला एक ' माणूस ' गवसला. त्याच्याबरोबर त्याची प्रियदर्शिनी. काकानी हाती नांगर धरला. तुम्ही बी पेरलंत. एकमेकांना धीर दिलात. न्याहारीचाही आठव नाही. कणाकणानं ती जमीन मोहरून निघाली. हसू लागली. कोवळी कोवळी गुलजार कणसं डोलू लागली ... समाधानानं तुम्हां दोघांचेही चेहरे डवरून आले. अश्रूंचेही मोती बनले .... अशी अनेक वर्षे पार झाली, भरतीचा आनंद लुटीत अन् ओहोटीचीही लज्जत चाखीत तुमच्या उज्वल आकांक्षा पूर्णत्वास येत होत्या. आता फक्त तृप्तीचीच ढेकर .... अन् काकी, तुम्ही गेलात .... काकांच्या पावलाबरोबर चालणारे तुमचे पाऊल लुप्त झाले. सप्तपदी संपली.

१८ जुलै १९६९. ताराराणी विद्यापीठाला उजळून टाकणारी एक तेजस्वी ज्योत मालवली .... पण काकी तुमची जीवनज्योत मालवली असं तरी कसं म्हणू ? तुमचा चिरंजीवी आत्मा इथं निरंतर वावरताना दिसतो, जाणवतो. काकांच्या कर्तृत्वाला आव्हान करणारी, प्रेरणा देणारी तुमची प्रत्यक्ष मूर्ती जरी आज समोर दिसत नसली तरी तुमच्या त्यागमंदिरातून एक आवाज सतत घुमत असतो.

" Breathes here a noble soul of a noble woman, whose whole life was a sacrifice, a great long one. "

खरं सांगू का काकी, पराक्रमी पुरुषाच्या जीवनाचा खरा शिल्पकार स्त्रीच असते. काही वेळेस तो शिल्पकार प्रसिद्धीच्या प्रकाशात येतही नाही. पतीच्या पराक्रमाला तुम्हीच बहर आणलात ... सर्वस्वाचा त्याग केलात. त्यातच जीवनाची कृतार्थता मानणारी महान् पतिव्रता ठरलात !

काकी, तुमचं व्यक्तिमत्व कसं प्रसन्न वाटायचं. तुमची विलोभनीय मूर्ती चांदणं शिंपीत चालायची. तुम्ही हसलात की मोगरा फुलायचा. तुमचे ते मृदू शब्द ... मोती घरंगळावेत असे वाटायचे आणि प्रत्येकाबद्दल आस्था तरी किती तुम्हाला !

मला तो छोटासा प्रसंग नेहमी आठवतो. तेव्हा मी अगदी नवी नवरी होते. नुकतीच शाळेत लागले होते. ही शाळा बघून अगदी हरखून गेले होते. त्या दिवशी तुम्ही सत्यनारायणाची पूजा बांधली होती. तुम्ही न् काका पूजेला बसलात. अगदी लक्ष्मी-नारायणाची जोडी. किती पवित्र वातावरण होतं ते . शेवटी आम्ही आवराआवर करीत होतो. तुम्ही माझ्याजवळ आलात. माझ्या हिरव्या चुडयाकडे पहात प्रश्न केलात, " नवीन का ? केव्हा लग्न झालंय ?" मी बावरूनच गेले. " गेल्या महिन्यात. "– मी लाजत

लाजत उत्तरले. " वा, छान, छान, आज काम चांगलं केलंस हं ! " असं म्हणून तुम्ही माझ्या पाठीवरून हात फिरविलात !

कृतार्थ हाताचा तो स्पर्श माझ्या पाठीवर एक अदृश्य ठसा उमटवून गेला आहे. श्रीरामचंद्राच्या पाच बोटांचा पवित्र ठसा खारीची सारी जमात आपल्या पाठीवर अजूनही मिरवते आहे. त्या खारीला लाभला तसाच एक स्पर्श काकी, तुम्ही मला दिलात. अजूनही तो मला तसाच जाणवतो, भावतो !

तुमच्या मधाळ नजरेतून असंख्य शद्व उमटत. निरंजनातल्या ज्योतीप्रमाणे तुमचं जीवन ! सुखाचे मृदुल क्षण असोत वा दु:खाचे कढ असोत, तुम्ही शान्तपणा कधी सोडलाच नाही. शान्तपणे जगलात... आणि ह्या जगाचा निरोप घेतलात तोही शान्तपणे. तो शान्तपणा पाहून पुनवेच्या चंद्रप्रकाशाची शीतलता जाणवायची. ह्या शीतल प्रकाशामुळेच सागराला भरती येते ना ! काकांच्या पराक्रमाच्या सागराला असंच उधाण यायचं.

त्या दिवशी तुमच्या दुखण्याला जोर होता. असह्य वेदनेनं तुम्ही मूकपणे तळमळत होता.... आपल्या वेदनेची झळ काकाना लागू नये म्हणून ! कारण त्याना महत्वाच्या कामासाठी मुंबईला जावयाचं होतं. तुम्हाला विकलतेत सोडून त्यांचं मन बाहेर पडायला धजेना. त्यांची मन:स्थिती द्विधा बनली. तुम्ही ते ओळखलंत. त्याना जवळ बोलावून सांगितलंत – " माझं दुखणं काय रोजचच आहे. तुम्ही प्रथम तुमचं काम पूर्ण करा. माझी काळजी करू नका." आणि आपल्या वेदना लपवून त्याना तुम्ही हसत हंसत निरोप दिलात. असेच आणि कितीतरी प्रसंग..... ज्यांतून भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ दिसे.

– आणि काकी केवढं आश्चर्य ! तुम्ही अजातशत्रू होतात. उभ्या आयुष्यात तुम्ही कधी कोणाला दुजाभावाने वागविले नाही. सर्वांचं स्वागत तुम्ही हंसतमुखानं करीत होतात. जणू साक्षात्

लक्ष्मीदेवता काकांच्या घरी नांदत होती. असं वैभव खेळत होतं– पण गर्वाची सावलीही तुमच्यावर पडली नाही.

गोरगरिबांची तुम्हाला किती तळमळ. तुमची भरलेली ओंजळ सदैव कलंडती ! आज आपल्या ताराराणी विद्यापीठात ही निष्पाप पाखरं बागडताना पाहिली की वाटतं काकी, तुमचा स्नेहपूर्ण हात तुम्ही त्यांना दिला नसता तर आज बिचारी ही पाखरं कुठच्या पिंजऱ्यात अडकून पडली असती कोण जाणे ? तुम्ही सुरू केलेल्या गरीब साहाय्य निधीतून कितीतरी भुकेलेल्यांच्या भुका भागताहेत. त्यांना पुस्तकं, गणवेष मिळताहेत. कार्यक्रमांच्या द्वारा त्यांना पुढं आणलं जातं. त्यांनी मागे राहू नये म्हणून त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरविलं जातं. दीनदलित विद्यार्थिनींना पूर्ण साहाय्य करण्याची तुमची इच्छा आज सर्वार्थानं फलद्रूप होत आहे. तुम्ही म्हणजे दयाक्षमाशांतीची त्रिमूर्ती ! तुमच्या हृदयातून दयेचा झरा अखंड पाझरत होता. त्यासाठी तुम्ही केवढा मोठा त्याग केलात. तुमच्या असीम त्यागापुढं माझं मस्तक सदैव नम्र राहील.

तुमची कूस उजवली नाही म्हणून तुमचा संसार कधीच थांबला नाही. तुम्ही अगतिक झाला नाहीत. मायेच्या पंखाखाली ताराराणी विद्यापीठाला घेतलंत. संस्थेचा संसार सजवून हजारो मुलींची ‘माता’ तुम्ही बनलात. जगन्माता ! स्वतःची व्यथा विसरून स्वतःला स्वतःत हरवून घेतलत– सुखस्वप्नांची इच्छा न धरता तुम्ही स्वतः सारं काही संस्थेला बहाल केलंत. इतकंच नव्हे तर आपला प्राणाहून प्रिय पतीही सरस्वतीच्या सेवेसाठी ह्या त्यागमंदिराला अर्पण केलात. हे समर्पण दैवी, अलौकिक आहे. हे समर्पित जीवन कधीच नष्ट होणार नाही. तुम्हाला अपत्य नव्हतं– पण दत्तक घेण्याचा मोहही तुम्हाला झाला नाही. सारी धनसंपत्ती तुम्ही विश्वस्तनिधी स्थापून ताराराणी विद्यापीठाला देऊन टाकलीत.

धन्य धन्य ही समर्पित भावना. आम्हा शिक्षकांबद्दलही किती आपुलकी तुम्हाला. असंच आम्ही तुमच्याकडे एकदा चांदणी भोजनासाठी जमलो होतो. आणि तेथे जाणवलं तुम्ही उत्कृष्ट सुगृहिणी आहात. सारी कामं तुम्ही उरकीत होतात. घरभर फिरणाऱ्या तुमच्या कोमल पदन्यासा नं त्या घरात चैतन्य नांदायचं, त्या दिवशी तुम्ही जातीनं रांधलंत, आम्ही खूप जेवलो. आम्हाला आग्रह करणारे ते हास्यवदन व त्या जेवणाची चव जन्मभर तुमची याद देत राहील. खरंच काकी, अगदी आदर्श सहधर्मचारिणी होतात. तुम्ही पती हाच परमेश्वर मानलात, काकांच्या अंगीकृत कार्यात तुम्ही प्रत्यक्ष भाग घेतला नाहीत तरी त्या कार्यामागील प्रेरणा, स्फूर्ती, कौतुक, सल्ला-सूचना तुमच्याच होत्या. काकांचं, सुद्धा तुमच्यावर गाढ प्रेम. तुमच्या श्रद्धेवर व विश्वासावर तर हा जगन्नाथाचा रथ ते ओढत होते. आणि काकी, आजही ज्या योजना काका आखीत आहेत, जे उपक्रम साकार करीत आहेत व यशस्वितेकडे हा जो रथ द्रुतगतीनं चालला आहे, तो चालवताना ते प्रथम मनोमन तुमचंच स्मरण करतात.

—आणि किनई काकी, तुमच्या जयंती पुण्यतिथीचे जेव्हा कार्यक्रम साजरे होतात ना, तेव्हा आम्ही तुमच्या आठवणी-गोडवे गायला लागलो की, धैर्याचा मेरुमणी असणारे काका, प्रसंगी वज्रापेक्षाही कठोर भासणारे काका, कुसुमाहूनही कोमल होतात. त्यांचे दाटलेले अश्रू बांध फोडून घळाघळा वाहू लागतात आणि ती आसवं सांगतात की काकी, तुम्ही काकाना किती प्रिय होतात.

संसाराच्या ह्या पटावरून तुम्ही अर्ध्यातूनच उठून गेलात. काकाना केवढा हादरा बसला. दुःखातिशयानं ते उद्गारले, "गेली! माझी सरोज गेली — माझी आई गेली." पण भावनांच्या आहारी जाऊन चालण्यासारखं नव्हतं. हाती घेतलेलं कार्य तडीस न्याव–

याचं होतं. ईर्षा उत्पन्न झाली. उमेद वाढली. तुमचा अदृश्य हात त्यांना धीर देत होताच.

दिवसेदिवस संस्थेचा व्याप वाढत आहे. प्रवेशासाठी गर्दी उसळत आहे. तुम्ही आणि काकानी जी स्वप्नं पाहिली होती ती बव्हंशी पूर्ण होत आहेत. काकांच्या योजना सुंदर आहेत. महा-विद्यालय काढायचं म्हणताहेत, मुलींसाठी स्वीमिंग पूल, एक सभागृह, अनेक संकल्प. तुमचा आशीर्वाद द्या अन् ते संकल्प सिद्धीप्रत पोचवा. काकांची अहोरात्र धडपड सुरू असते. अनेकांचे हात ह्या सुकार्यासाठी लागलेले आहेतच. त्यांच्या योजना खात्रीनं फलद्रूप होतीलच.

आयुष्यात दुःखामुळे तुम्ही कधी निराश झाला नाहीत. सौख्याच्या अमृतानं कधी बेहोष झाला नाहीत. गर्व तुम्हाला शिवला नाही. मोहात कधी गुरफटला नाहीत. काकी, तुम्ही किती किती चांगल्या होतात हो. म्हणूनच का तुम्ही देवाला आवडलात? देवाच्या तर तुम्ही निस्सीम भक्त. अर्धे अधिक आयुष्य त्या देवाच्या उपासनेतच घालवलंत. पतीची सेवा अन् देवाची भक्ती. पण काकी तुमचं हृदय हाच देवाचा देव्हारा होता. तेथे सत्य, शिव, सौंदर्य होतं. म्हणूनच तुमच्या पुण्याईनं अनेकांचे संसार फुलले, आजही बहरताहेत, उद्याही उमलतील.

काकी, तुम्ही देवाची निरपेक्ष भक्ती केलीत. पण त्या देवानं तुमची सत्वपरीक्षाच पाहिली. आयुष्याच्या अखेरीस तुम्ही असह्य यातना भोगल्या. काकानी जंग जंग पछाडले. दूरदूरचे डॉक्टर आणून तुमच्यावर उपचार केले. डोळ्यात तेल घालून तुम्हाला जपलं– तुम्हाला नेण्यासाठी मृत्यू टपून बसला होता. काका त्याच्याशी झुंज देत होते. तुम्हीही प्रचंड धैर्यानं मृत्यूशी सामना देत होतात. आपला पती आपल्यामागे एकाकी होईल, त्याच्या कार्यात त्याला प्रेरणा कोण देणार? त्याची ध्येयस्वप्नं

अपूर्ण राहू नयेत म्हणून तुम्ही तळमळत होतात. तुम्हाला या जगातून लवकर जावयाचं नव्हतं. पण अखेर विझायचं नसतानाही हा जीवनदीप विझला. मिर्झा गालिब म्हणतात,

"गमे हस्ती का 'असद' किससे हो जुज़ मर्ग इलाज
शमअ़ हर रंग में जलती है सहर होनेतक"

जीवनातील कष्टावर मृत्यूशिवाय इलाज कोणता ? काकी तुम्ही मरणातही जगत आहात. अमर आहात. आमच्यावर ही सावली अशीच ठेवा. तुमच्या इच्छा तृप्त करण्यासाठी काकांना अधिकाधिक समर्थ करा.

तुमच्याजवळ अधिक काय मागू ?

तुमचीच,

**सौ. ममता**

* *

एक स्मृतिशलाका

# तेथे कर माझे जुळती

— **रा. वा. शेवडे**

नेहमीच घडत आले आहे.

माझ्या जुन्या मित्रांनी माझे क्षेमकुशल विचारावे, मी ताराराणी विद्यापीठात अनेक वर्षे आहे असे सांगावे आणि त्यांना ताराराणी विद्यापीठ पाहण्यासाठी बोलवावे.

एकदा असेच झाले.

माझे एक परिचित डॉक्टर महाशय (पी. एच्‌डी )अचानक काही कामासाठी कोल्हापुरात आले. ताराराणी विद्यापीठात मी त्याना घेऊन आलो आणि सांगितले, शून्यातून विश्व निर्माण करणारी श्री. व्ही. टी. पाटील यांची ताराराणी विद्यापीठ ही एक किमया आहे. दीड हजार विद्यार्थिनी येथे शिक्षण घेत आहेत. भव्य क्रीडांगण, संगीत, चित्रकला, टंकलेखन, गृहजीवनशास्त्र, सैनिकीशिक्षण हे सारं काही येथे केवळ स्त्रियांसाठी आहे. आपल्या समाजानं पराकोटीचा अन्याय स्त्रीजातीवर केला. तिला अबला म्हटलं, वासनामूर्ती म्हटलं आणि तिचे प्रगतीचे, विकासाचे सारे दरवाजे बंद करून टाकले. या कोंडमाऱ्यापासून वरिष्ठ वर्गातील स्त्री दूर राहू शकली नाही, मग बहुजनसमाजाच्या स्त्रीची काय कथा ?"

डॉक्टरसाहेब एकाग्र मनाने ऐकत होते. पुन्हा जाता जाता त्याना मी म्हटले, " ताराराणीचा नैतिक वारसा घेऊन गेली पंचवीस वर्षे कार्य केलेल्या श्री. व्ही. टी. पाटील यांच्या तपश्च-र्येचं हे फळ आहे. पण आणखी एक मोठी व्यक्ती या सुयशाची वाटेकरीण आहे. ती म्हणजे त्यांची सुविद्य, सुशील, सोशिक, सुपत्नी सौ. सरोजिनीदेवी या होत. त्यानी आपल्या पतीच्या या पुण्य-कार्याला केवळ तनमनच दिले असे नव्हे तर धनसर्वस्वही सम-र्पण केलं. "

सौ. सरोजिनीदेवींचा उल्लेख कानी पडताच डॉक्टर महा-शय अचंबा व्यक्त करून उद्‌गारले, "बरोबरच आहे. इतिहासाला मेरी क्यूरी,पर्ल बक, हेलेन केलर, मॉंटेसोरी यांसारख्या असामान्य तेजस्वी स्त्रियांची आठवण होते. पण लौकिक दृष्टचा ज्या सामान्य स्त्रियांनी आपल्या भक्तिभावबलानं पतिदेवाला प्रोत्साहन देऊन चंदनाप्रमाणं झिजून असामान्य कर्तृत्व अज्ञात राहून करून दाख-विलं, अशा सौ. सरोजिनीदेवी यांच्यासारख्यांचं स्मरण राहात नाही. आजच्या लोकशाहीच्या काळात अशा स्त्रियांच्या कर्तृत्वाची नोंद निदान पुढील पिढीला प्रेरक म्हणून होणं अत्यंत आवश्यक आहे. "

पाहुण्यांचे हे विचार ऐकून मी विचारमग्न झालो आणि माझ्या मनात सौ. सरोजिनीदेवींच्या उल्लेखनीय आठवणी उसळून वर आल्या.

माझ्या विद्यार्थीदशेत त्यांच्या बंधूचा मित्र म्हणून मी त्यांच्या घरी वरचेवर जात असे. एकदा आम्ही बाहेरच्या सोप्यात कॅरम खेळत होतो. काही वेळानी कपबश्यांचा आवाज कानी पडताच त्यांचे बंधू चहा पिण्यासाठी आत निघून गेले. माझ्या कानी शब्द आले.

" आपल्या मित्राला सोडून तुम्ही एकटेच चहा पिण्यासाठी

आत कसे आलात? त्याना तरी आत बोलवा नाहीतर हे दोन कप घेऊन बाहेर चहा घ्या."

सौ. सरोजिनीदेवींचा हा आवाज मी ओळखला. त्यांच्या–बद्दल माझे मन प्रेमाने आणि आदराने भरून आले.

सौ. सरोजिनीदेवींचे वडील दत्ताजीराव पाटील बेनाडीकर मोठे हुशार पण उग्र, करारी स्वभावाचे होते. ते एकदा रागावले म्हणजे शांत होणे कठीण. त्यांच्या रागावर एकच उतारा होता आणि तो म्हणजे त्या ठिकाणी सौ. सरोजिनीदेवींचे आगमन.अशा एक ना अनेक गोष्टीमुळे त्या आपल्या सर्व बंधूंच्या आवडत्या ठरल्या असल्यास त्यात काय आश्चर्य?

त्यानी आपल्या सर्व बंधूवर अपार माया केली. मला नेहमी वाटायचे दिनकरराव, जयसिंगराव, विश्वासराव फार भाग्यवान होत. कारण त्यांना अशी मायाळू बहीण मिळाली.

श्रीयुत दिनकरराव माझे विशेष मित्र. त्यांच्या लग्नामुळे एक छोटेसे वादळ निर्माण झाले. वडिल मंडळींनी लग्नाला अनु–मती दिली नव्हती. पण एकदा लग्न उरकून गेल्यानंतर सौ. सरो-जिनीदेवीनी नववधूस बोलावून घेतले. तिला मंगलचुडा भरला आणि सुसंस्कारी पाटील घराण्याचे वळण कसे असते आणि पाट–लाच्या लक्ष्मीने कसा संसार करावयाचा असतो हे अत्यंत थोड–क्यात पण साध्या सोप्या बालबोध शब्दात सुनावले.

सौ. सरोजिनीदेवींचे सर्वात छोटे बंधू विश्वासराव अकाली निधन पावले. विश्वासराव आता वाचू शकणार नाहीत असे तज्ञ डॉक्टरांचे मत पडल्यानंतर आपल्या आवडत्या दत्तगुरूपाशी सौ. सरोजिनीदेवींनी जी पूजासाधना केली तिला तुलना नाही.

कै. विश्वासरावांच्या मुलांच्या अभ्यासाच्या संदर्भात

सौ. सरोजिनींदेवीनी मला एकदा आपल्या बंगल्यावर बोलावून घेतले. त्या म्हणाल्या, "पोरं पोरकी झालीत." पुढे त्यांच्या तोंडून शब्दच उमटेना, बंधूंच्या आठवणीमुळे दोन मिनिटे संतत अश्रु–धारा त्यांच्या नेत्रांतून वाहात होत्या. मी काय करायला हवे हे प्रत्यक्ष शब्दांपेक्षा त्यांच्या नेत्रातल्या अश्रूमुळे अधिक समजलो.

गेली पंचवीस वर्षे या ना त्या कारणाने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष त्यांच्या घराशी वा कुटुंबियांशी माझा ऋणानुबंध जडत गेला. मला असे दिसून आले की त्या एक आदर्श गृहिणी होत्या. त्यांचे पती श्री. व्ही. टी. पाटील यांच्या अनेकविध कार्यामुळे त्यांच्याकडे सतत माणसांची वर्दळ असे. ही माणसे सर्व थरातील असत. त्या–सर्वांची आपलेपणाने जिव्हाळ्याने ऊठबस, चौकशी, अडीअडचणी त्या समजून घेत व यथामती निवारण करीत.

सौ. सरोजिनीदेवी शांत, सुंदर, गौरकाय, सुस्वभावी, श्रद्धाळू, मांगल्यमूर्ती होत्या. माझ्या मनात त्यांच्याबद्दल नितांत आदर वसत होता. पत्नीच्या पुण्याईवर पतीच्या पराक्रमाची कमान चढती राहते हे जर खरे असेल तर श्री. व्ही. टी. पाटील यांच्या कार्यातील सिंहाचा वाटा मी सौ. सरोजिनीदेवी यानाच देईन. एखाद्या मंदिराचा कळस आपणास दिसतो पण ज्या भक्कम पायावर ते मंदिर उभे आहे त्या पायाचे दगड कोणाला दिसत नाहीत. प्रचंड तोफखान्याला दाद न देणाऱ्या बुलंद तटाच्या भिंती दिमाखाने मिरविताना दिसतात पण त्या भिंतींच्या चिऱ्यांना एकजीव सांधणारा चुना कोणास दिसतो का ? सौ. सरोजिनी–देवींची श्री. व्ही. टी. पाटील यांच्या जीवनातील भूमिका ही अशीच आहे. आपल्या पतीचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक जीवन त्यानी फुलविले म्हणून विसाव्या शतकाचे एक दृष्टे महा-कवी बा. भ. बोरकर यांच्या खालील अमर पंक्ती मला यथार्थ वाटतात.

कविराज म्हणतात,

ज्या प्रबळा निज भावबलाने
करिती सदने हरिहर भुवने
देवपतींना वाहुनि सुमने
सदनी फुलबागा रचिती
तेथे कर माझे जुळती

* *

# माझ्या मालकिणबाई

**– दिनकरराव साळोखे**

तो पहिलाच दिवस होता माझ्या नोकरीचा. गाडी सुरू करून साहेबांच्या दाराशी लावली. साहेबांच्या दिलदार स्वभावाविषयी खूप ऐकलं होतं आणि पहिल्या मुलाखतीच्यावेळी त्यांच्या प्रेमळ स्वभावाचा, खानदानी वागणुकीचा प्रत्यय आला होता. त्यामुळे त्यांच्याविषयी मनात फारशी भीती नव्हती. पण ड्रायव्हर म्हटल्यावर माझा त्यांच्या घरच्या मंडळीशीही संबंध येणार होता. पण त्यांच्याविषयी मला काहीच माहीत नव्हतं. मनात विचार येत होता, त्यांचं कुटुंब कसं असेल ? तऱ्हेवाईक, रागीट की तोंडाळ ? कारण ऐकून होतो, श्रीमंतांच्या बायका खूपच तऱ्हेवाईक असतात, नोकरमाणसांना तडातडा बोलतात वगैरे वगैरे.

इतक्यात साहेबांच्या दमदार पावलांच्या आवाजानं मी भानावर आलो. चटकन दरवाजा उघडून मी उभा राहिलो. साहेबांच्या बरोबर मालकिणबाईही गाडीत बसल्या. दरवाजा बंद करून मी आपल्या जागी येऊन बसलो. गाडी सुरू केली. समोरच्या आरशातून सहज मालकिणबाईंचं दर्शन घेतलं. त्या सुंदर, सात्त्विक शांत चेहऱ्याकडे पाहून मी मनोमनी धन्य झालो. त्या सुप्रभाती मला देवीचंच दर्शन घडलं. वाटलं माझ्या मालकाना (विश्वनाथाना) साक्षात् उमाच लाभली आहे. त्यांच्याबरोबर मी अद्याप

एक शब्दही बोललो नव्हतो, पण माझं मन मला सांगू लागलं, "बेटचा, तू भाग्यवान आहेस. फार मोठ्या प्रेमळ छत्राखाली वावरणार आहेस!" आणि झालंही तसंच. पहिल्या दिवसापासूनच त्यांची दया, क्षमा, शांतीची नजर मजवर फिरू लागली. त्यामुळे मी पाटीलसाहेबांचा ड्रायव्हर राहिलोच नाही. त्यांच्या घरचाच एक माणूस बनलो.

विलक्षण मजबूत वाडा त्यांचा. त्या वाड्यात सकाळपासून संध्याकाळपर्यंत माणसांची रीघ लागायची, आजही लागते. प्रत्येकांची सुखदु:खं शांतपणे ऐकून घेऊन प्रत्येकाला मार्गदर्शन करण्यात माझे मालक रममाण होत. तर त्या सर्वांचं आदरातिथ्य करण्यात मालकिणबाई गुंग असत. दिवसभर कित्येकजण जेवून जात. खूप गडीमाणसं होती तेव्हा बंगल्यात. पण मालकिणबाई जातीनं हजर राहून प्रत्येकाला आग्रहानं जेवू घालत. त्या अन्नपूर्णेच्या दर्शनानं प्रत्येकजण शांत आणि समाधानी होऊन बाहेर पडे.

माझ्या मालकिणबाईंची दत्तगुरूंच्यावर विलक्षण श्रद्धा! दररोज पूजाअर्चा, पोथीवाचन, आरती झाल्याखेरीज त्या इतर कामाला सुरुवात करीत नसत. पहाटे उठून चालत जाऊन त्र्यंबोलीदेवीचं दर्शन घेऊन येणं हा त्यांचा नित्याचा क्रम होता. उभ्या पावसातही पायी देवीला खेटे घालणं त्यानी चुकविलं नाही. दर पौर्णिमेला नृसिंहवाडीला त्या जात असत. देवाची महापूजा, अभिषेक, संततधार, ब्राह्मणभोजनं, वस्त्रदान काही ना काही सतत सुरू असेच. त्याखेरीज दोघांच्या धामयात्रा वर्षातून एक दोन वेळा होतच. प्रत्येक वेळी गाडी चालविण्यास अर्थातच मी असे. काही वेळा गाडी नादुरुस्त होई आणि रस्त्यातच अडकून पडण्याची वेळ यायची. पण प्रत्येक वेळी मालकीणबाईंच्या देवावरच्या विलक्षण श्रद्धेच्या जोरावर काही चमत्कार घडावं आणि आम्ही सुखरुप इच्छित

स्थळी पोचत असू. असे कितीतरी प्रसंग आठवतात मला. गाडीत काहीतरी तुटल्याचा आवाज आला की गाडी थांबवून सचिंत मुद्रेनं मी बॉनेट खोलून पाहत असे. मालकिणबाई मला सांगत, " अरे दिनकर, चल तू. श्रींच्या रुद्राभिषेकाला चालले आहे. तेव्हा गाडीला काही होणार नाही. " आणि खरोखरच गाडी वाडीला जाऊन परत कोल्हापुरला येईपर्यंत कुरकुर करीत नसे. त्यांच्या पाठीशी परमेश्वर होता हे मात्र खरं. एकदा मालकिणबाई व त्यांच्याबरोबर आणखी काही मंडळींना घेऊन आम्ही हुबळीला गेलो होतो. श्री सिद्धारुढ स्वामीजींच्या पादुकांना अभिषेक घालून ब्राह्मणभोजन घालून परतत होतो. उशीर होऊ नये म्हणून गाडी मी वेगातच सोडली होती. बेळगावजवळ गाडी येताच एकदम मालकिणबाई म्हणाल्या, " दिनकर, जरा गाडी थांबव. " मी गाडी थांबवली. मालकिणबाई गाडीतून उतरल्याही नाहीत आणि काही बोलल्याही नाहीत. मी विचारलं, " गाडी का थांबवली ? चहा वगैरे हवा काय ?" त्या मला म्हणाल्या, "तुला हवा असेल तर चहा पिऊन ये. मी चहा घेतला." पण मला समजेना की यानी गाडी का थांबविली ? मी परत गाडीकडे आलो, पाहतो तर काय ? गाडीचं चाकच फिरलं होतं. स्टेअरिंगरॉडच तुटला होता. गाडी पळत असताना जर हे घडलं असतं तर माझा गाडीवरचा ताबा सुटून भीषण अपघातच झाला असता. आता माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. मालकिणबाईंच्या देवावरील अमाप श्रद्धेनंच त्याना आणि आम्हांलाही वाचवलं होतं.

पण म्हणूनच मालकिणबाई जेव्हा खूप आजारी झाल्या तेव्हा माझं मन म्हणू लागलं, "ज्या देवानं मालकिणबाईंना अनेकदा संकटातून वाचविलं, ज्याची त्यांच्यावर सततची कृपादृष्टी आहे, तो आता त्याना लवकर बरं का करत नाही?" मी एकदा

त्याना तसं बोलूनही दाखविलं. त्यावेळी त्या मला म्हणाल्या, "दिनकर, वेडा आहेस तू. शरिराच्या व्याधी कुणाला चुकल्यात का? रामकृष्ण परमहंसासारखा तपस्वी ! तोही चुकवू शकला नाही हे सारं. मी तर एक सामान्य स्त्री. देवाचा काय दोष त्यात?" शरिराला खूप यातना झाल्या, पण अखेरपर्यंत देवावरची श्रद्धा ढळली नाही त्यांची.

मालकिणबाईंना जास्त झालं तेव्हा मी त्यांच्या दर्शनाला गेलो. शांतपणे मालकिणबाई सांगू लागल्या, "दिनकर, रडू नकोस. मी जाणार असले तरी माझा आत्मा ध्यानी, मनी, स्वप्नी साहेबांच्या बरोबरच राहील. तुझ्या सर्व माणसांना माझा आशीर्वाद सांग. देव तुझं कल्याण करो." आणि अखेर मालकिणबाईंनी या जगाचा निरोप घेतला. माझे मालक पोरके झाले. माझ्या प्रेमळ छत्राचा एक खांब कोसळून पडला.

त्यांच्या मृत्यूला आज तीन वर्षे होऊन गेली असली तरी त्यांच्या जाण्यानं सर्वांच्याच मनाला झालेली जखम अद्यापि बुजलेली नाही, कधी बुजेल असं वाटत नाही. मी तरी त्याना कसा विसरेन ? माझ्या उद्धारकर्त्या देवतेच्या स्मृतीस माझे कोटी कोटी प्रणाम !

* *

# क्षणचित्रे

## (१)

स्थावर मालाचा ट्रस्ट झाल्यावर, जंगम मालाचे व्यवस्था–पन करण्याचे काम चालू होते. हिरे, मोती व सुवर्ण अलंकारांची मोजदाद, वजन व त्यांची बाजारभावाने होणारी किंमत नोंद-विण्यासाठी धर्माधिकारी सराफ याना काकीजींनी बोलावून घेतले होते. मी तेथे सहाय्यक म्हणून काम करीत होतो. काकीजी एक एक अलंकार अलमारीतून काढून देत होत्या. बराच वेळ हे काम चालल्यावर त्यानी अगदी बारीक सारीक नगही बाहेर काढले. एखादी वस्तू चुकून राहू नये याची त्या दक्षता घेत होत्या. आम्हा उभयतांना त्याचे फारच आश्चर्य वाटले. आलमारीचा कानाकोपरा शोधत असताना सराफच म्हणाले, " राहीना एकादी दुसरी वस्तू. तेवढीच दुसऱ्या कुठल्यातरी खाजगी कामा–साठी पुढेमागे त्याचा उपयोग करता येईल. "

" छे, छे घ्यायचं म्हणजे अगदी सर्व, संपूर्ण. नाहीतरी हा ट्रस्ट करा असा मला कुणाचा आग्रह का होता?"

संग्राहक – **व्ही. ए. चव्हाण**

## (२)

काही काळ मुलींचे हॉस्टेल साहेबांच्या बंगल्याच्या पहिल्या मजल्यावर होते. त्यात रिमांडहोमच्या बऱ्याच मुली होत्या. शाळेच्या आवारात माळ्याने वांग्यांचे वाफे तयार केले होते. पीक भरघोस आले नी दररोज हाऱ्यांनी वांगी निघू लागली.मग हॉस्टेल-मधील मुलींना दररोज वांग्याची भाजी सुरू झाली. शेवटी शेवटी मुली कंटाळल्या पण रेक्टर बाईपुढे त्यांचे काही चालेना. ही कुणकुण वरच्या मजल्यावर राहत असलेल्या काकीजींच्या काना–वर गेली नि लगेच त्यानी मला बोलावून घेतले.

" रावण, दररोज, दररोज वांग्याचीच भाजी खाऊन तुम्हाला नाही का कंटाळा येणार? "

" होय, त्यात बदल हवाच की. " मी म्हणालो.

" मग, या रिमांड होमच्या मुली परक्या का आहेत ? हे पैसे घ्या, नी ओले नारळ व बटाटे आणून त्यांची भाजी त्यांना आलटून पालटून वाढत चला " म्हणत काकीजींनी एक शंभर रुपयाची नोट माझ्यापुढे टाकली. " ही वांगी बागवानाला विकून, त्यातून बटाटे आणता येतील. तुम्ही पदरचे पैसे का खर्च करता? राहू देत ते. " मी म्हणालो.

" वांगी शाळेची, म्हणजे घरची, घरचा माल विकू नये. ती वांगी शाळेतील सारे शिपाई व कारकून मिळून वाटून घ्या. नि रावण, एक लक्षात ठेवा, सत्कारणी लागतो तो खर्च नव्हे. " या त्यांच्या शब्दांनी मी माझ्या जीवनात एक नवा धडा शिकलो. 'बरं,' म्हणून ती नोट उचलून परतत असताना त्याच आणखी म्हणाल्या, " नी हे पाहा, त्या रेक्टरबाईना जाऊन सांगा की या रिमांड होमच्या मुलींना हिडीस-फिडीस केलेलं मला मुळीच खपणार नाही. नी तसं झालं तर, मग मलाच खाली यावे लागेल."

संग्राहक – **बा. स. रावण**

## स्थिराचित्र : अस्तित्वरहित अस्तित्व

बीज स्वतःला गाडून घेतं
आणि अस्तित्वात येतो
विशाल वृक्ष
सरणावर प्रेत जळतं
मरणातून जीवन उरतं
–हे सत्य आहे
अबाधित.
कुणी म्हणतं मरण हा शाप आहे
कुणी म्हणतं जीवनच शाप आहे
–मग खरं काय यातलं?
खरं एकच दोन्हीमधलं–
अस्तित्वरहित अस्तित्व.

**–शामकांत जाधव**